सं।क्र. ११३९१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

IRBK-0111391

IRBK-0111391

बाल जीवनमाला — पुष्प ७ वें

# चार्लस डार्विन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ५२७६ दि. बो. पी.
क्रमांक ३५०६ नोंद दि. ६/९/७७

लेखक :

द. शि. टकले

म. ग्रं. स. ठाणे. वाचनालय शाखा.
दा. क्र. ११३८१ नों. दि.
वि. बालवाङ्मय
IRBK-0111391
पी.
१९० बी, ४.

प्रथमावृत्ति : नोव्हेंबर १९६५

मुखपृष्ठ : श्री. दत्ता सावंत

☆

किंमत दोन रुपये

☆

मुद्रक व प्रकाशक
व्ही. आर. बिरोडकर
मुद्रणस्थळ : न्यू एज प्रिंटिंग प्रेस,
१९० बी, खेतवाडी मेन रोड, मुंबई ४.
प्रकाशनस्थळ : पी. पी. एच. बुकस्टॉल,
१९० बी, खेतवाडी मेन रोड, मुंबई ४

# अनुक्रमणिका


| | | | पान |
|---|---|---|---|
| १ | एकोणिसाव्या शतकातील एक आश्चर्य ! | ... | ५ |
| २ | भाबडा चार्लस ! | ... ... | ९ |
| ३ | श्रीयुत " वायु " | ... ... | १५ |
| ४ | धंद्याच्या शोधात— | ... ... | १९ |
| ५ | उपाध्येगिरीची तयारी ! | ... ... | २५ |
| ६ | पुढील जीवनाचा पाया | ... ... | ३१ |
| ७ | संशोधक डार्विन | ... ... | ३५ |
| ८ | डार्विनची तपःसाधना | ... ... | ४१ |
| ९ | विवाह आणि वैवाहिक जीवन | ... | ४७ |
| १० | लेखनकार्य | ... ... | ५१ |
| ११ | " जीवजातींची उत्पत्ति " | ... ... | ५७ |
| १२ | " निसर्गाची निवड " | ... ... | ६१ |
| १३ | जीवनज्योत मालवली ! | ... ... | ६९ |
| १४ | डार्विन यांचे कार्य | ... ... | ७३ |



निसर्गशास्त्रज्ञ



जन्म : १८०९ ] चार्लस् डार्विन [ मृत्यु : १८८२

★ १ ★

# एकोणिसाव्या शतकातील एक आश्चर्य !

१८५९ मध्ये थोर शास्त्रज्ञ चार्ल्स डार्विन यांचा Origin of Species–जीवजातींची उत्पत्ति–हा ग्रंथ प्रसिद्ध झाला आणि साऱ्या जगात एकदम प्रचंड खळबळ उडाली ! धर्ममार्तंडाना तर धक्काच बसला; विचारवंतांना, शास्त्रज्ञांना एक नवा आधार मिळाला; सामान्य लिहित्यावाचत्या माणसांमध्ये प्रचंड कुतूहल निर्माण झाले !

पहिल्याच दिवशी पुस्तकाच्या साडेबाराशे प्रती खपल्या. लवकरच तीन हजारांची दुसरी आवृत्ती निघाली. तीही केव्हाच खलास झाली. १८७६ पर्यंत या ग्रंथाच्या थोड्याथोडक्या नाहीत तर १६,००० प्रती खपल्या. लोकप्रिय कथा-कादंबऱ्यांना देखील क्वचितच लाभणारे भरघोस यश या शास्त्रीय विषयावरील पुस्तकाला मिळाले !

या यशाची स्वतः डार्विनना मात्र खात्री नव्हती ! त्यांचा स्वभावच तसा होता. स्वतःचे कर्तृत्व, मग ते खरोखरी कितीही मोठे असेना, त्याला ते कमीच लेखीत. एमा वेजवूड यांच्याशी त्यांचे लग्न झालेले; परंतु आपल्याला या स्त्रीने पति म्हणून का निवडले हे कोडे त्याना जन्मभर सुटले नव्हते ! आपल्या पुस्तकाला मिळालेली प्रसिद्धी पाहून त्यांना स्वतःला देखील आश्चर्य वाटले. आपण आपल्या आयुष्याची चांगली वीस वर्षे या ग्रंथाच्या तयारीसाठी दिली आहेत, भरपूर पुराव्यावाचून आपण एकही अक्षर लिहिलेले नाही, कोणाला आपले म्हणणे खोडून काढावयाचे झाले तर ते अशक्यप्राय आहे, निदान चांगलेच कठीण आहे.... यापैकी एकही विचार त्यांच्या मनात आला नाही. विचार

होता फक्त एकच, जीवित कारणी लावल्याचा ! त्याचे सार्थक केल्याचा ! भावना होती एकच. तुडुंब भरून राहिलेल्या आनंदाची आणि समाधानाची !

या त्यांच्या ग्रंथाने साऱ्या जगाला हादरा दिला. आणि आजवर धर्मांनी जखडून ठेवलेल्या विचारांना बंधमुक्त केले. आणि हीच गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. स्वातंत्र्याचा आपण सर्वसामान्यपणे अर्थ समजतो तो म्हणजे राजकीय स्वातंत्र्य; गुलामीपासून पारतंत्र्यापासून मुक्तता. परंतु राजकीय स्वातंत्र्य हा तर निव्वळ पाया आहे. विचार—भौतिक वस्तुस्थितीवर आधारलेले विचार—ही एक जबरदस्त शक्ति आहे आणि म्हणून विचारस्वातंत्र्याला फार महत्त्व आहे.

विचार करणारे आपले मन संपूर्ण स्वतंत्र कधीच नसते. आपल्या स्वातंत्र्याला परंपरेच्या, धर्माच्या, वेडगळ समजुतींच्या मर्यादा पडलेल्या असतात. त्यांच्या अस्तित्वाची पुष्कळदा आपल्याला जाणीवही नसते; त्या ओलांडण्याचे आपल्या मनात येत नाही; आणि आलेच तर आपली आपल्यालाच भीती वाटते. चाकोरी सोडून स्वतंत्रपणे विचार करण्याची आपल्या मनाला सवय नसते.

विचारस्वातंत्र्याचा हक्क बजावण्यासाठी कित्येक थोर लोकांना देहदंड सोसावा लागलेला आहे, हेही आपण पुष्कळ वेळा विसरतो. “ पृथ्वी सूर्याभोवती फिरते ” हे शब्द तोंडावाटे न काढण्याचे पोपच्या कोर्टात गॅलीलिओला नाइलाजाने कबूल करावे लागले. पण तो पोपला म्हणाला, “ पृथ्वीने सूर्याभोवती फिरावे अशी माझी इच्छा नाही. पण मी काय करू ? ती आपली सूर्याभोवतीच फिरत राहते ! ” ग्रहमालेचे केंद्र पृथ्वी नसून सूर्य आहे, हा कोपरनिकसचा शोध जाहीर करण्याबद्दल ब्रूनोला जिवंत जाळण्यात आले. ‘ सत्य तेच सांगेन ’ हा निर्धार न सोडणाऱ्या सॉक्रेटिसच्या घशात विषाचा पेला ओतण्यात आला.... धर्माने, अंधश्रद्धेने, वेडगळ समजुतींनी आणि त्यांचा पाठपुरावा करणाऱ्या,

कालबाद झालेल्या जुनाट समाजव्यवस्थेचा पुरस्कार करणाऱ्या, समाजशास्त्रज्ञांनी मनुष्याच्या विचारस्वातंत्र्याची केवढी गळचेपी केलेली आहे! त्यासाठी केवढे क्रूर उपाय योजले आहेत! किती भयंकर शिक्षा दिल्या आहेत!

आणि म्हणूनच डार्विन यांच्या "**जीवजातींची उत्पत्ति**" या ग्रंथाचे महत्त्व असाधारण आहे. त्यांनी नुसते सत्य लोकांच्यापुढे मांडले नाही; तर त्याच्या पाठीमागे भरभक्कम पुराव्याचे डोंगर उभे केले. पुराव्याचे हे डोंगर उभे करावयाला त्यांनी आपल्या हयातीतील वीस वर्षे–या वीस वर्षातील क्षणन् क्षण–कारणी लावला.


जीवजातींची उत्पत्ति भौतिक नियमानुसार झालेली आहे, तिच्याशी ईश्वराचा काही संबंध नाही, असे सिद्ध झाल्यास ईश्वराला कार्य ते काय उरेल? आता 'पाखंड' माजणार, लोक 'अधर्माचरणी' होणार, त्यांना 'पापपुण्याची चाड' उरणार नाही, अशी धास्ती सनातन्यांना पडली. त्यांच्या हिशेबी ईश्वर म्हणजे एक बडा फौजदार! आणि या ईश्वरविषयक खुळचट कल्पनांच्या जोरावरच त्यांचे ऐषआराम चालू होते. तेव्हा धर्माचा हा आधार निसटणार की काय म्हणून त्यांचे ऊर धपापू लागले.

मनुष्याच्या विचारस्वातंत्र्याभोवती उभे असलेले अवाढव्य बुरुज धडाक्याने उडवून देणारे जे संशोधकवीर होऊन गेले त्यांच्यात डार्विन यांना फार मानाचे स्थान आहे.

मनुष्याच्या विचारात आमूलाग्र क्रांति घडवून आणणारे हे डार्विन कसे दिसत, कसे वागत?

चला, आपण एकोणिसाव्या शतकात प्रवेश करू या. हे पहा त्यांचे जन्मस्थान–श्रूस्बेरी! त्यांचे वडील डॉ. रॉबर्ट वेरिंग डार्विन यांचा हा बंगला. बागेत फिरणारा हा आरक्त मुद्रेचा मुलगा दिसतो आहे ना, तोच—

**चार्लस! चार्लस डार्विन!**



जीवनाच्या विकासातील पहिल्या सात अवस्था.

(खालून वर)

(पुढच्या सात अवस्थांसाठी पान १८ पहा)

अनुक्रम ६२०३६ ... क्रमांक ३५०६ ... नोंद दि.

★ २ ★

# भावडा चार्लस !

चार्लसला धाप लागलेली दिसते ! का बरं ? मधल्या सुटीत शाळेतून त्याने पळ काढला. शाळेला बुट्टी मारण्यासाठी नव्हे हं ! शाळा मैल दीड मैल दूर होती. पण ही स्वारी शाळेतून सहज घरी येई. कारण तो मुळी धावतच यावयाचा आणि धावतच परत जायचा. आई वारल्याला वर्ष होऊन गेले होते. तरीही मधल्या सुटीत घरी येऊन जाण्याची त्याची सवय मोडली नव्हती.

हा काय करतो आहे बरं बागेत ? तो पहा, तो कुणाशी तरी बोलत आहे.

" वा ! बराच आहेस की ! माझी बोटे काय चोखतो आहेस ? भूक लागली की काय तुला ? माझी बोटेच खाऊन टाकशील की. चल, पुरे आता, मला शाळेत जायचे आहे परत ! तुझ्यासारखा रिकामटेकडा नाही मी शेपूट हालवीत फिरायला ! "

एकूण स्वारी आपल्या कुत्र्याशी बोलत आहे तर !

तो कुत्र्याशी, मांजराशी, अगदी त्यांना बरोबरीचे मित्र समजून बोलत आहेसे दिसते !

तो पहा. तो पुढे गेला. कुत्रा मागून चाललाच आहे. माळी बागेत काम करीत आहे – कुदळीने माती उकरण्याचे.

त्याच्या पाठीमागे थोड्याच अंतरावर ते पहा एक सुंदर पाखरू टुणटुण उड्या मारीत चालले आहे. माळ्याच्या पाठीशी–किती जवळ !

माळ्याने जरा मागे हात लांबविला तर त्याच्या ते सहज हाती लागेल. कुत्र्याच्या मनात त्याच्यावर झेप घालावयाची आहेसे दिसते. एका हाताने त्याला आवरून चार्ल्स त्या पक्षाकडे बघत आहे. किती धीट आहे हे पाखरू !

काय बरे करते आहे ते ? हां, समजले. माळ्याने उकरलेल्या जमिनीतील किडे हा आयतोबा चोचीने टिपून खात आहे. माती उकरण्याची खटपट नाही, काही नाही. बाकी त्याला काय माती उकरता येणार इवल्याशा चोचीने ! हिवाळ्यात जमीन किती कडक झाली आहे ! त्याच्या छोट्याशा चोचीचा जोर तो काय........चार्ल्सची अगदी समाधी लागलेली दिसते.

प्राणीजीवनाचे निरीक्षण करताना अशीच त्याची समाधी लागे ! पण ही पहा ! कॅथरीन्–त्याची बहीण–आली वाटते !

" चार्ली ! तुला शाळेत नाही जायचे ? "

" हो जायचंय की, निघालोच "

" तुला उशीर नाही होणार ? "

" उशीर कशाला ? मी धावत धावत जाईन की ! " चार्ल्स शाळेकडे पळत सुटला.

शाळेत त्याच्या आवडीचे असे विषय जवळजवळ नव्हतेच. ग्रीक, लॅटिन, इतिहास, भूगोल, गणित....छे:! त्याचे डोके उठायचे.... त्या सनावळी, ते डोंगर ! नद्यांच्या त्या याद्या ! ते व्याकरणाचे नियम ! नको बुवा हे असले काही ! नाही म्हणावयाला भूमिती मात्र त्याला आवडे. पाठांतराचा त्याला कधीच बाऊ वाटला नाही. आजच बघा ना, शाळेत गेल्यावर लागलीच कवितेचा तास होता.

शिक्षकांनी आठवड्यात पाठ करण्यासाठी एक कविता दिली होती. आदल्या दिवसापर्यंत चार्लसची ती पाठ नव्हती. त्याच्या

शेजारच्या विद्यार्थ्याला हे माहीत होते. शिक्षकांनी विचारले, "कुणी पाठ केली नाही कविता? उभे रहा पाहू!"

चार्लसच्या मित्राला वाटले आता चार्लस उभा राहणार. पण चार्लस आपला बसूनच राहिला. शिक्षकांनी कविता म्हणून दाखवायला सांगितल्याबरोबर त्याने ती घडघडा म्हणून दाखविली.

असे जरी होते तरी त्याचे कोणतेच शिक्षक त्याच्या अभ्यासावर खूष नसत. त्यांना वाटे याचे आजोबा इरॅस्मस डार्विन केवढे विद्वान्! याचे वडील रॉबर्ट वेरिंग केवढे प्रख्यात डॉक्टर! पण हा मुलगा काही डार्विन कुळाला शोभत नाही. कसे होणार याचे?

इतर मुलांसारखे चुरचुरीत बोलून हंशा पिकविण्याचे चार्लसला जमत नसे. काहीतरी विशेष करून नाव कमाविण्याची इच्छा मात्र जबरदस्त!

एक दिवस त्याचा एक मित्र त्याला एक सुरेख तांबडे फूल दाखवीत होता. तो म्हणाला, "किती छान लालभडक रंग आहे नाही?"

चार्लस ऐटीने म्हणाला, "ऊं, त्यात काय आहे? आपल्याला फुलांचे रंग बदलता येतात."

"होय?"

"मग? त्यांत काय आहे" चार्लसने ठोकून दिले.

"म्हणजे निरनिराळ्या रंगांच्या पाण्यात बुडवून—"

"छे, छे, तसे नाही काही. त्यांच्या मुळाशी रंगीत पाणी घालायचे. तांबडे पाणी घातले की तांबडे फूल. त्यात काय आहे?"

खरे म्हणजे चार्लसला यातले काहीच माहीत नव्हते. "आम्ही देखील कोणीतरी आहोत, म्हटलं" असे समाधान त्याला हवे होते.

याच हौशीने त्याने एक दिवस आणखी एक गंमत केली. कल्पना-विश्वात रमणाऱ्या त्याच्या मनाने ठरविले की लोकांना जादूने चकित करावयाचे. बागेतील फळे तोडून त्याने त्यांची रास केली. त्यांच्यावर पालापाचोळा घालून ती झाकून टाकली. आणि आपली भावंडे,

माळी यांना बोलावून घेतले. तो म्हणाला, "बघा मी काय जादू करतो ती! या पानांच्या ढिगातून मी जादूने फळांची रास काढून दाखवतो तुम्हाला!" असे म्हणून त्याने पाचोळा दूर केला. मोठ्या थाटात तो विचारीत होता, "काय? आहे की नाही जादू?" माळी तर केव्हाच हसत निघून गेला होता. कॅथरीन म्हणत होती, "शीः, ही कसली जादू! तूच तर ठेवलीस फळे झाकून!!"

चार्ल्स एके दिवशी नेहमीप्रमाणे धावतपळत शाळेतून घरी जाण्याच्या घाईत होता! इतक्यात त्याच्या कानावर शब्द आले, "चार्ली, घरी जातोस? थांब, गंमत पाहायची आहे तुला?" त्याचा मित्र गार्नेट बोलत होता.

गंमत पहावयाची म्हणजे चार्ल्सला दुसरे काही सुचत नसे.

"कसली गंमत?" त्याने उत्सुकतेने विचारले. "आपण केक्स घेऊ या!" गार्नेटने आपल्या गमतीची कल्पना दिली.

"ऊं, त्यात काय गंमत?" श्रीमंत बापाच्या लेकाला केक्सचे काय कौतुक?

"अरे, फुकट मिळतात फुकट मला!" गार्नेटच्या या शब्दांनी मात्र चार्लसची खात्री पटली की इथे काहीतरी गंमत आहे खास. त्याने विचारले, "फुकट?"

"हो फुकट! चल दाखवतो"

दोघेही गावातल्या एका दुकानात गेले. ओळखीचा दुकानदार हसत हसत म्हणाला, "काय हवं?"

गार्नेटने सांगितले, "अर्धा डझन केक्स!"

दुकानदाराने केक्सचा पुडा गार्नेटच्या हाती देऊन आपल्या वहीत काहीतरी लिहिले.

दुकानाबाहेर रस्त्यावर आल्यावर चार्लसने विचारले, "कुठल्याही दुकानात असे फुकट मिळेल तुला?"

" हो तर "

" दाखव बघू " चार्लसने आव्हान दिले.

दोघेही एका स्टेशनरीच्या दुकानात गेले. गार्नेटने वह्या मागितल्या. दुकानदाराने दिल्या आणि आपल्या वहीत लिहिले.

" आहे बुवा. " चार्लसच्या आश्चर्याला पारावर राहिला नाही. त्याला आता एकच शंका होती. ती म्हणजे गार्नेटलाच वस्तू फुकट का मिळतात ? गार्नेटने त्याच्या शंकेचे निरसन केले. तो सांगू लागला, " त्यात काय आहे ? माझे पणजोबा होते ना, त्यांनी या गावाला पैशांची खूपखूप मदत केली होती. त्याच्या बदल्यात आमच्या घरात सगळ्यांना या गावात सगळ्या वस्तू फुकट मिळतात. "

" म्हणजे तुमची सगळी माणसे सगळ्या दुकानदारांच्या ओळखीची आहेत ? " चार्लसला अजून हे गौडबंगालच वाटत होते !

" ओळख नसली म्हणून काय झालं ? आमची एक खूण आहे. हे बघ, दुकानात गेले की आपली हॅट असते ना, ती अशी हलवायची. म्हणजे दुकानदाराला खूण पटते. आणि तो पैसे मागत नाही. "

" मग मी गेलो दुकानात आणि तू दाखवलीस तशीच हॅट हलवली, तर मला देखील तो माल फुकट देईल ? " चार्लसने आपली अडचण पुढे मांडली. " मग ? त्यात काय आहे ? तू करूनच बघ ना. मात्र बरोबर अश्शीच हलवली पाहिजे हं हॅट ! "

हॅट हलविण्याची रंगीत तालीम झाली. गार्नेटने " ठीक " म्हटल्यावर चार्ल्स जवळच्या दुकानात गेला. ठरल्याप्रमाणे त्याने हॅट हलवून म्हटले " केक्स द्या सहा. "

दुकानदाराने पुडा हाती दिला आणि चार्ल्स अत्यानंदाने बाहेर पडणार, तोच दुकानदाराने त्याच्या कोटाची बाही पकडून म्हटले, " पैसे ? "

चार्लसने फिरून हॅट हलविली.

दुकानदाराने म्हटले, "अशी हॅट काय हलवीत बसला आहात मिस्टर? खिशात हात घाला आणि पैसे काढा लवकर!"

"पैसे नाहीत, पण मी हॅट हलविलीना!" चार्लसने दुकानदाराची चूक दुरुस्त करण्यासाठी म्हटले.

"हॅट हलवीत बस बाहेर! प्रथम तो पुडा आणा इकडे, हॅट हलवतो आहे, येडपट नाहीतर!"

चार्ल्स रिकाम्या हाताने बाहेर पडला. त्याला गार्नेट दिसला नाही. तो केव्हाच दूर निघून गेला होता.

संशोधनाच्या बाबतीत पुराव्याची कसून छाननी करणारे डार्विनसाहेब व्यवहारात शेवटपर्यंत हे असे भोळेच राहिले. कोणी काही सांगितले की त्यांचा चटकन विश्वास बसे!



★ ३ ★

# श्रीयुत "वायु"

डॉ. बटलर यांच्या शाळेत चार्लसच्या आयुष्याची वर्षे एकामागून एक चालली होती. कंटाळवाण्या विषयांचा अभ्यास तो मन मारून करीत होता. वडिलांना कसे दुखवायचे? आपल्या मुलाने काहीतरी विशेष करून दाखवावे ही त्यांची इच्छा होती. पण चार्लसचा काहीच इलाज चालत नव्हता. नावडत्या विषयात, कोणीहि झाला तरी, कशी काय प्रगति होणार? शिवाय शाळेचे विषय आवडत नाहीत म्हणून चार्लस थोडाच स्वस्थ बसून राहिला होता? त्याला कितीतरी छंद होते. त्यांचा पाठपुरावा करताकरता, दिवसच्या दिवस, महिनेच्या महिने कसे निघून जात होते त्याचा त्याला पत्ता देखील नसे!

श्रूस्बेरीहून सुटीच्या दिवशी तो आपल्या आजोळी मेर या गावी जाई. गावाजवळच चांगले जंगल होते. तेथे भटकणे, ससे पकडणे, बंदुकीने पाखरे मारणे....यात त्याची सुटी केव्हाच संपून जाई. श्रूस्बेरीला परतल्यावरदेखील त्याचे निरनिराळे संग्रह वाढतच असत. ही काय निरनिराळी फुलपांखरे! ही काय तऱ्हेतऱ्हेची अंडी, शिंपा, गारगोट्या!...एक ना दोन! घरट्यातून अंडी काढताना तो कधीच सगळीच्या सगळी काढून घेत नसे. घरट्याशी परतल्यावर आपली सारी अंडी नाहीशी झालेली आढळली तर ती बिचारी पक्षीण केवढा आकांत करील! ती कल्पना सुद्धा त्याला दुःसह होत असे. तो आपला एका घरट्यातून एकच अंडे काढी. त्यांची तो नोंद ठेवायचा. त्यामुळे कोणते अंडे कोणत्या पक्षाचे आहे हे त्याला चटकन ओळखता

येई. संग्रह करण्याच्या या नादातच त्याच्या संशोधकाच्या भावी जीवनाची पूर्वतयारी होत होती.

शाळेत त्याचे मन रमत नसे. एक भूमिति हा विषय सोडला तर बाकी सारे काही नीरस वाटे त्याला. आणखी एका नवीन गोष्टीची त्याला अलीकडे गोडी लागली. त्याचा मोठा भाऊ रसायनशास्त्राचा अभ्यास करीत होता. त्याला मदत करण्यात चार्लसला फार मजा वाटे. निरनिराळे वायू कसे तयार करावेत, ते शुद्ध की अशुद्ध हे कसे तपासून पहावे, हे तो पाही. भावाबरोबर काम करताना त्याचा प्रयोगशाळेतील वेळ अगदी मजेत जाई. अभ्यासातील त्याच्या प्रगतीबाबत हेडमास्तर डॉ. बटलर यांच्या कानी जे गेले होते त्यावरून त्यांचे चार्लसबद्दल काही चांगले मत झालेले नव्हतेच. तशातच प्रयोगशाळेतील त्याच्या उद्योगांची वार्ता त्यांच्या कानावर जाताच त्यानी चार्ल्सला एक पदवी बहाल केली, —" चक्रम ! "

आपल्या संवगड्यांबरोबर खेळायला, गप्पा मारायला चार्लसला वेळच मिळत नसे. कुत्री मांजरे दिसली की त्यांच्याशी तो बोलू लागायचा. कुत्र्यांशी त्याची मैत्री अगदी चटकन जमे. कुणाचाही कुत्रा कितीही भयंकर असेना, चार्लसने चुटकी वाजवून शीळ घातली रे घातली, की सातजन्मांची मैत्री असल्यासारखा तो शेपूट हालवीत चार्लसजवळ यावयाचा....हे सारे करून बरोबरीच्या विद्यार्थ्यांत मिसळायला वेळ राहणार कोठून ? त्यांच्यात चार्लसचे नाव निघाले की कोणीतरी म्हणायचा " तो वायू बनवतो आहे. " होता होता सर्वांनी चार्लसला आणखी एक टोपणनाव बहाल केले. " श्री वायु "—"Mr. Gas !"


बरोबरीच्या मुलांनी चार्ल्सची अशी चेष्टा करावी हे साहजिकच होते. चारचौघांसारखे न वागणारांची अशीच चेष्टा होते. पण हेही खरेच, चारचौघांसारखे सारे काही करीत राहणाराला आपला सारा वेळ त्यातच खर्चावा लागेल, काही विशेष कर्तृत्व दाखवायला वेळच शिल्लक

राहणार नाही. संशोधनासारख्या कार्याला एकाग्र वृत्ति लागते, छंद जडावा लागतो, वेड लागावे लागते. ज्याचा ध्यास घेतला त्याचा पाठपुरावा करण्यात सारे काही वेचावयाची तयारी लागते. तेव्हाच काहीतरी भव्य, महान् असे त्याच्या हातून घडते. यालाच जुने नाव आहे तपश्चर्या. चार्लसची ही तपश्चर्या चालू होती–अगदी तरुण वयापासून. तपश्चर्या नेहमीच खडतर असते. तीत अनेक संकटे असतात. आणि असेच एक संकट चार्लसवर चाल करून येत होते.

चार्लसला डॉ. बटलर चक्रम म्हणत,- शाळेतील विद्यार्थी त्याला श्रीयुत गॅस म्हणून चिडवीत. शाळेतील शिक्षक म्हणत, कसे होणार डॉ. रॉबर्ट यांच्या मुलाचे ? या गोष्टी चार्लसच्या गावीही नव्हत्या. तो ससे पकडीत होता, फुलपाखरे पकडीत होता, कीटक जमवीत होता, बंदुकीने पाखरे अचूक टिपत होता. त्याला कशाचीच खंत नव्हती. भविष्याची चिंता नव्हती. त्याच्या वर्तमानातील प्रत्येक क्षण जिज्ञासेने व कुतूहलाने भरलेला होता.

चार्लसचे वडील डॉ. रॉबर्ट डार्विन मोठे यशस्वी डॉक्टर ! त्यांच्या हाताला गुण आहे असा त्यांचा लौकिक दूरवर पसरला होता. डॉ. बटलर व त्यांच्या शाळेतील शिक्षक यांच्या ते परिचयाचे होते. चार्लसच्या अभ्यासावर त्यांचे लक्ष असे. रोग्यांना तपासण्यासाठी वेळीअवेळी त्यांना बाहेर पडावे लागे. तशा कामाच्या घाईतही चार्लसच्या अभ्यासाची आस्थेने चौकशी करण्यासाठी ते मधून मधून वेळ काढीत. दरवेळी शिक्षक म्हणत, “ चार्लसला अभ्यासाची गोडीच नाही. त्याला नाही जमत हा अभ्यास ! ”

“ काय करावे या मुलाला ” असा प्रश्न पडला डॉ. रॉबर्ट यांच्यापुढे !



**जीवनाच्या विकासातील पुढच्या सात अवस्था**

खाली दाखविलेली अवस्था आठवी आहे. सर्वात वर दाखवलेली अवस्था अर्वाचीन काळातील आहे. मनुष्य हा जीवसृष्टीचा मुकुटमणि–सर्वात प्रगत प्राणी आहे. म्हणून तो अगदी वरच्या चित्रात दाखविला आहे.

(पहिल्या सात अवस्थांसाठी पान ८ पहा)

* ४ *

# धंद्याच्या शोधात —

चार्लसच्या वडिलांनी त्याला बोलावून घेतले. अभ्यासाविषयी विचारपूस केली. चार्लस अभ्यास करण्याची खटपट करी हे तर खरेच होते. त्याला अभ्यास जमतच नव्हता, त्याला त्याचा काय इलाज ? डॉक्टरसाहेब व्यवहारी होते. त्यांनी पाहिले की या मुलाला नावडती गोष्ट करायला लावण्यात काहीच अर्थ नाही. त्याचा जन्म फुकट जाईल. त्यापेक्षा त्याला वैद्यकीच्या कॉलेजात घालावे हे उत्तम. मेडिकल कॉलेजमध्ये कदाचित तो अभ्यासात लक्ष घालील आणि आपल्या घराण्याचा डॉक्टरीचा धंदा नीट चालवील. बस, इतके झाले तरी पुरे. त्यांनी आपले वडील डॉ. इरॅस्मस डार्विन यांच्याबद्दल त्याला सांगितले, स्वतःबद्दल सांगितले आणि मेडिकल कॉलेजमध्ये जाण्यासाठी त्याला तयार केले.

वडील निघून गेले. चार्लस एकटाच बसलेला होता. वडिलांनी सांगितलेले सारे काही त्याला फिरून फिरून आठवत होते. होय, आपले आजोबा फार थोर होते. मलादेखील मोठे व्हावयाचे आहे त्यांच्यासारखे. पण हे जमणार कसे ?

आजोबा—डॉ. इरॅस्मस डार्विन ! इंग्लंडमधील किती प्रसिद्ध व विद्वान डॉक्टर होते ते. इंग्लंडच्या राजाने देखील त्यांना आपले डॉक्टर म्हणून नेमण्याची इच्छा दर्शविली होती ! फिलॉसॉफिकल सोसायटीच्या संस्थापकांपैकी ते एक. आयुष्यभर त्यांचा व्यासंग चालूच होता. अगदी म्हातारपणी त्यांच्या मुलाने–चार्लसच्या वडिलांनी–त्यांना म्हटले, " आता विश्रांति घ्या, व्यवसाय बंद करा, कशाला करता आता

प्रॅक्टीस ?" त्यांचे उत्तर अगदी लक्षात ठेवण्यासारखे आहे. ते म्हणाले, "बाबारे, विश्रांति बिश्रांति झूट आहे. काम करणाऱ्या माणसाने अशी विश्रांति घेतली तर तो एक नशाबाज तरी होईल, नाहीतर त्याचे मन तरी दुबळे होईल. माणसाने मरेपर्यंत काम हे केलेच पाहिजे."

इरॅस्मस डार्विन जरा तोतरे बोलत. एका चावट तरुणाने त्यांना विचारले, "काय हो डॉक्टरसाहेब, तुम्ही तोतरे बोलता; म्हणजे तुम्हाला चमत्कारिक वाटत असेल नाही बोलताना ?" डॉ. इरॅस्मस यांनी ताडकन् उत्तर दिले : "छे, छे, उलट त्यामुळे नीट विचारपूर्वक बोलण्याची सवय लागली आहे मला ! शिवाय त्यामुळे हे असे गाढवासारखे प्रश्न विचारायला वेळच रहातो कुठे ?"

चार्लसच्या मनात आले आपल्यालादेखील असे बोलता आले असते तर !

वडिलांनी आपल्या भावांबद्दलदेखील खूप ऐकवले चार्लसला ! चार्लसचे एक चुलते संशोधक होते. पू व आंतरत्वचा यांच्यावरील संशोधनाबद्दल त्यांना सुवर्णपदक मिळाले होते. त्याच्या दुसऱ्या एका चुलत्यांना काय विविध आणि विचित्र छंद होते ! कुठे गावाची खानेसुमारी कर, आकडेशास्त्रात डोके घाल, वंशवृक्ष तयार कर, नाहीतर नाणी जमव....स्वतःच्या वडिलांची कर्तबगारी तर तो पाहतच होता. दूरदूरच्या गावाहून असाध्य रोगी त्यांच्याकडे आशेने येत आणि बरे होऊन, डॉक्टरांना धन्यवाद देत घरी परतत. रॉयल सोसायटीचे सदस्य म्हणून देखील त्यांना निवडण्यात आले होते.

असे आपले घराणे ! आणि आपण ?....चार्ल्स विचार करीत होता; "आजोबा, वडिल, चुलते सारे विद्वान् व प्रसिद्ध. आपले काय होणार ? वडिलांना आपल्याबद्दल काळजी वाटते ते बरोबर आहे. ते म्हणतात त्याप्रमाणे मेडिकल कॉलेजमध्ये जाऊन, नीट अभ्यास करून, परीक्षा पास होऊन दाखविलीच पाहिजे. आपल्यासाठी वडील इतके करतात. आपण त्यांच्या मनाला दुःख देता कामा नये...."

आणि वडिलांनी सुचविल्याप्रमाणे चालण्याचा चार्लसने निर्धार केला. बस ! आता शाळेत पूर्वीसारखे चालावयाचे नाही. प्रथमपासून व्यवस्थित अभ्यास करायचा ! परिक्षेत चांगले यश कमवायचे आणि वडिलांना सुखी करायचे ! ठरला निश्चय !

आणि ठरल्याप्रमाणे १८२३ मध्ये चार्ल्स एडिंबरो येथील मेडिकल कॉलेजमध्ये दाखल झाला. त्याचा मोठा भाऊ तेथेच शिकत होता.

मेडिकल कॉलेजमध्ये गेल्यावर डॉ. बटलर यांच्या शाळेतल्यासारखे त्याला चक्रम् म्हणायला येथे कोणी नव्हते. शाळेत असतांना त्याला मिळालेली दुसरी पदवी "श्रीयुत वायु" ही देखील आता मागे पडली. या चेष्टेचे चार्ल्सला काहीच वाटत नसे हे निराळे. खरे म्हणजे वाईट वाटायला त्याला वेळच नसे. इतका तो आपल्या छंदात रमून गेलेला असावयाचा.

मेडिकल कॉलेजमध्ये आल्यावर देखील अभ्यासाच्या बाबतीत जे शाळेत तेच येथेही. नद्या-पर्वतांच्या याद्या गेल्या पण त्यांच्या जागी औषधांच्या आणि रोगांच्या आल्या, इतकाच फरक ! रोग, त्यांची लक्षणे, त्यांचे निदान, त्यांचे उपचार.... एक ना दोन. चार्लसला हे सारेच विलक्षण कंटाळवाणे वाटे. त्यांतून प्राध्यापकांनी तरी हसत खेळत शिकवून आपल्या विषयात गोडी निर्माण करावी ! त्याचेहि नाव नको. विषय एक आंबट तर शिकविणाऱ्या प्राध्यापकांची चर्या सात आंबट ! चार्लसचा जीव अगदी उबून गेला. डेस्कवर कोपर टेकून, हातावर हनुवटी ठेवून, उघड्या डोळ्यांनी व कानांनी चार्लस ही सारी व्याख्याने ऐकावयाचा.

पण त्याचे लक्ष असायचे स्वतःच्या छंदात ! रक्ताचा तांबडा रंग, आंतर-त्वचेचा गुलाबी रंग हे शब्द कानावर आले की त्याच्या मनश्चक्षूंसमोर या रंगांची फुलें आणि फुलपाखरे नाचू लागायची. प्राध्यापक आपली कंटाळ-वाणी व्याख्याने देत रहावयाचे आणि इकडे चार्लसचे मन जंगलात

भटकत असावयाचे. ज्ञान म्हणजे कॉलेजच्या चार भिंतींमध्ये दिली जाणारी व्याख्यानेच असे मानले तर, कॉलेजमध्ये चार्लस अगदी कोरडा ठणठणीत राहिला असेच म्हणावे लागेल. कॉलेजमधील व्याख्यानांचा हा पाऊस चार्लसच्या डोक्यावर पडत राहून तो कोरडाच राहिला.

मात्र एखादी गोष्ट मनाने घेतली की तिला सर्वस्व अर्पण करावयाची चार्लसची वृत्ति होती. तिचेच फळ म्हणून त्याने आपले दोन निबंध **प्लीनियन सोसायटी** या नावाच्या शास्त्रज्ञांच्या एका संस्थेच्या सदस्यांपुढे वाचून दाखविले. त्यांना ते आवडले. एका लहानशा, मर्यादित जगात का होईना, पण शास्त्रज्ञ म्हणून चार्लसला मान्यता मिळू लागली.

कॉलेजला सुटी झाली आणि चार्लस घरी परतला. नेहमीप्रमाणे तो आपल्या आजोळी, मेर येथे गेला. येथे सभोवती चांगले जंगल होते. खांद्यावर बंदूक टाकली की चालला चार्लस जंगलात ! हरणे, ससे, रानकोंबडे यांची तो शिकार करावयाचा. बंदुकीत वापरलेली दारु आणि मिळालेली शिकार यांचे प्रमाण चांगलेच फायद्याचे असे. कारण त्याने गोळी घातली आणि ती फुकट गेली असे कधीच घडत नसे.

याच मुक्कामात मेर येथे त्याची एका शास्त्रज्ञाशी गाठ पडली. या खेडेगावी त्यांना गप्पा मारायला कोण मिळणार ? एकटा चार्लस. विविध विषयांवर त्यांच्या गप्पा चालत. अर्थातच बोलण्याचे काम एकटे शास्त्रज्ञ महाशयच करीत. ऐकण्याचे काम चार्लसचे. चार्लसला गप्पांची बैठक कधीच रंगविता आली नाही. तो मधूनमधून एखादी शंका मात्र विचारी. त्यावरून शास्त्रज्ञांनी उद्गार काढले, " आहे, या तरुण मुलामध्ये काहीतरी विशेष आहे खास ! "

शास्त्रज्ञांच्या या उद्गाराचा चार्लसच्या मेडिकल कॉलेजमधील अभ्यासाशी काहीच संबंध नव्हता हे निराळे ! चार्लसला एक विचार सारखा टोचत राही. आपण वडिलांच्या इच्छेप्रमाणे चांगले डॉक्टर कसे होणार ?

नाही म्हणायला त्याला दिलासा देणारी एक गोष्ट घडली. आणि चार्ल्सच्या वडिलांना—डॉ. रॉबर्ट वेरिंग यांना—वाटू लागले, " चार्ल्स डॉक्टर होणार तर, आणि चांगला डॉक्टर होणार ! "

हल्लीप्रमाणेच त्या काळी देखील मेडिकल कॉलेजमधील विद्यार्थ्यांना, रोग्यांना तपासण्याचे व त्यांना औषधें देण्याचे काम दिले जाई. यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला शहराच्या गरीब वस्तीतील एकेक विभाग नेमून दिला जात असे. चार्लसकडे देखील असाच एक विभाग होता.

नीरस, रटाळ, व्याख्यानामध्ये मुळीच लक्ष न घालणाऱ्या चार्लसला हे काम आवडले. वृक्ष-वेलींशी, कुत्र्या-मांजरांशी आपुलकीने बोलणाऱ्या चार्लसच्या स्वभावाशी जुळणारे हे काम होते. आपल्या वेदना, दुःखे आणि आजार घेऊन रोगी त्याच्यापुढे येत आणि त्याचे मन हेलावून जाई. रोगाची तपासणी करून त्यावर औषधयोजना करण्यात चार्लस काही तरबेज नव्हता. पण ही उणीव भरून काढणारा एक मोठा गुण त्याच्या जवळ होता. तो म्हणजे सहानुभूति ! या सहानुभूतीने लोक त्याच्याकडे आकर्षिले जात.

आज देखील त्याच्यासमोर काही रोगी येऊन बसले. रोगांनी जर्जर झालेल्या त्या दुर्दैवी गरीब जीवांना पाहून त्याचे मन द्रवले. एकेकाची विचारपूस तो करू लागला.

" हं, कसे काय आहे आजी ? आज डोळे बरे दिसताहेत कालच्यापेक्षा. औषध घातलेत ना सांगितल्याप्रमाणे ? आणि डोळे मिटून पडून राहता ना ? "

" कसली पडून राहत्ये मी ? हातपाय हालवला नाही तर जेवायला कोण घालील मला ? काम बंद तर जेवण बंद होते आमचे गरीबांचे. हातावरं पोट आहे माझे, बाबा ! "

चार्लसला यातून बाहेर पडण्याचा मार्ग सापडत नसे. तिची वेदना त्याला जाणवे. त्याच्या तोंडून उद्गार बाहेर पडे, " अरेरे —"

एक जख्ख म्हातारा नातवाला खांद्यावर घेऊन त्याला थोपटीत पुढे आला.

चार्ल्सने सुरवात केली, “ कसं काय आहे आजोबा आज तुमच्या नातवाचे ? ”

“ रात्रभर रडून रडून आकांत केला पोरानं ! ” म्हातारा म्हणाला.

“ म्हणजे खोकला जास्त आला की काय ? ”


“ तसं नाही, पण काय होत होतं त्याला, देव जाणे. ”

“ बरे, द्या पाहू त्याला मांडीवर आडवा. आपण तपासू या त्याला ! अरे ! याचे पोट साफ नाही. याला आज रेच दिला पाहिजे. उद्या बरं वाटेल हं तुमच्या नातवाला. ”

अशा सहानुभूतीने ओथंबलेल्या शब्दांनी रुग्णांचे ताप निवत, दुःखे हलकी होत, त्यांना दिलासा मिळे.

हळूहळू चार्लसचे नाव जास्त जास्त लोकांच्या तोंडी येऊ लागले. त्याच्याकडे येणाऱ्या रोग्यांची संख्या वाढली. त्याच्याच बरोबरीच्या काही विद्यार्थ्यांना रोग्यांची वाट पहात माशा मारीत बसावे लागे. चार्लसकडे मात्र त्याची वाट पहात उभे असलेल्यांची रीघ लागू लागली.

हे वृत्त त्याच्या वडिलांच्या कानी गेले आणि ते हरखले. ते म्हणाले, “ चला, सुटलो या मुलाच्या काळजीतून ! ” त्यांनी चार्लसला म्हटले, “ तू आता चांगला डॉक्टर होणार हं चार्ल्स ! ” चांगला डॉक्टर याचा अर्थ त्यांच्या हिशेबी चांगली प्रॅक्टिस असणारा, खूप पैसा मिळविणारा, इतकाच होता. यश, कीर्ति, मोजण्याची त्यांची फूटपट्टी होती पैसा ! चार्ल्सची फूटपट्टी निराळी होती—विद्वानांनी केलेली प्रशंसा !



नवा. ... अनुक्रमांक ०२९७६ ... क्रमांक ...

★ ५ ★

# उपाध्येगिरीची तयारी !

वडिलांचा अंदाज साफ चुकीचा ठरणार होता. कारण डॉक्टरला जे गुण हवेत त्यांपैकी पुष्कळांची चार्लसच्या ठिकाणी वाणच होती. रोग्याविषयी वाटणारी सहानुभूति त्याच्याजवळ भरपूर होती, तिचा अतिरेक होता म्हटले तरी चालेल. या सहानुभूतीच्या पोटीच डॉक्टरच्या दृष्टीने दुर्गुण ठरेल असा एक दोष चार्लसमध्ये होता. तो म्हणजे त्याला दुःख अजीबात पाहवत नसे. विव्हळणाऱ्या कुत्र्यामांजराचे ओरडणे त्याला ऐकवत नसे; मग रोग्यांच्या आर्त किंकाळ्या तो कशा काय सहन करणार ?

शस्त्रक्रिया हा तर वैद्यकीय अभ्यासाचा एक आवश्यक भाग! कुशल शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरांनी केलेल्या शस्त्रक्रिया पाहणे हा विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचा महत्त्वाचा भाग असे. त्या काळच्या शस्त्रक्रिया आजच्यापेक्षा फारच निराळ्या असत. शस्त्रक्रिया कसल्या त्या ! चीरफाड अन कापाकापीच ती! त्याकाळी गुंगी आणणारी औषधे नव्हती. रोग्याने हालचाल करून शस्त्रक्रियेस व्यत्यय आणू नये म्हणून काय काय अघोरी उपाय योजीत ! रोग्याची एखादी रक्तवाहिनीच तोडून टाकीत आणि खूप रक्तस्राव होऊ देत; म्हणजे रोगी बेशुद्ध होऊन निपचित पडून राही. यानंतर होणाऱ्या शस्त्रक्रियेपाठोपाठ त्याचे क्रियाकर्मांतर करण्याची वेळ आली नाही तरच नवल ! कधीकधी रोग्याला बेशुद्ध करण्यासाठी त्याच्या डोक्यात बडगा हाणीत ! हा फटका खाऊनदेखील रोगी वाचलाच तर डॉक्टरची सुरी त्याला केंव्हा यमसदनाला पाठवील याचा नेम नसे !

हे झाले खूप वेळ चालणाऱ्या शस्त्रक्रियासंबंधी! शस्त्रक्रिया थोड्या वेळात आटोपण्यासारखी असेल तर रोग्याला टेबलावर आडवा घालून सभोवती पाचदहा बाप्ये त्याचे हातपाय घट्ट धरून ठेवीत.

अशीच एक शस्त्रक्रिया चार्लसने पाहिली. एका गरीब बिचाऱ्या मुलाला टेबलावर आडवे पाडले होते. लोकांनी त्याचे हात पाय दाबून धरले आणि डॉक्टरांनी आपली सुरी चालवायला सुरुवात केली. त्या पोराने अशा काही किंकाळ्या फोडल्या, ते असे काही तडफडले की बस्! पण डॉक्टरांचे तिकडे अजिबात लक्ष नव्हते. त्यांनी आपली चिरफाड चालूच ठेवली. भळभळा रक्त वाहत होते. त्याच्या चिळकांड्या उडतच होत्या. त्या किंकाळ्या, ते रक्ताचे थारोळे, ती असह्य तडफड... चार्लसला हा यमपुरीतील देखावा पाहवेना. त्याला वाटले, यापेक्षा बिचाऱ्याला सुखाने मरू दिले असते तरच फार बरे झाले असते. डॉक्टरला जर ही अशी खाटकासारखी कापाकापी करावी लागत असेल तर नको ते मेडिकल कॉलेज आणि नको ती डॉक्टरकी! आपले वडिल कसे काय करतात हा व्यवसाय देव जाणे!

आणि फिरून एकवार आणखी एक द्वंद्व निर्माण झाले–पुरे काय करावयाचे? आपली आवड की वडिलांची इच्छा?

आपण काय करणार? काहीतरी विशेष आपण निश्चितच करून दाखवू अशी त्याला उमेद होती. आणि ती साधार होती. मेर येथील त्या शास्त्रज्ञांनी आपल्याविषयी काय उद्गार काढले होते? आपल्यावर विश्वास टाकणाऱ्या रोग्यांची संख्या काय लहान होती? प्लीनिअन सोसायटीपुढे वाचलेले ते निबंध?...काही का असेना, ही डॉक्टरकी नको. त्याचा निश्चय झाला. एक विचार त्याच्या मनात कुजबुजून गेला. समजा आपल्याला परिक्षेत यश नाहीच मिळाले तर? तर काही उपाशी मरण्याची आपल्यावर पाळी येणार नाही खास. वडिलांनी चांगली तरतूद करून ठेवली आहे आपली.

फिरून एकवार तोच प्रश्न डॉ. रॉबर्ट डार्विन यांच्यापुढे उभा राहिला, ‘ आता काय करावे या मुलाला ! ’

१८२७–१८२८ चा काळ. मेडिकल कॉलेजमध्ये चार्लसला ठेवल्यास त्याच्या हातून काहीच होणार नाही; त्याच्या बाबतीत वेगळा काही तरी विचार करायलाच हवा, असे त्याच्या वडिलांनी ठरविले.

त्यांनी चार्लसला बोलावून घेतले. आणि विचारले, “ मग तुझा काय बेत आहे ? ”

या प्रश्नाचे चार्लस काय उत्तर देणार ? “ मी फुलपाखरांचा संग्रह करणार ”, “ शिकारी होणार ” असे सांगून भागणार नव्हते. “ मी आता चांगला अभ्यास करीन ” हे सांगण्यात आता काहीच अर्थ उरला नव्हता. ते यापूर्वी अनेकवार सांगून झालेले होते. तो आपला गप्प राहिला.

पण त्याच्या वडिलांना गप्प राहून विषय सोडून देणे परवडणार नव्हते. ते पक्के व्यवहारवादी होते. प्राप्त परिस्थितीत योग्य विचार करून जास्तीत जास्त योग्य ते करीत राहण्यात फायदा असतो, हे त्यांचे जीवनसूत्र. त्यांनी आपल्या मनाशी एक बेत पक्का केलेला होता.

त्यांनी फिरून सुरुवात केली. “ जर डॉक्टर व्हावयाचे नाही, तर मग तू करणार आहेस तरी काय ? तुला हा धावपळीचा उद्योग जमत नसला तर दुसरे काहीतरी केले पाहिजे. लोकांशी तुला मनमिळाऊपणाने वागता येते. तो तुझा स्वभाव आहे…”

चार्लसला काही पत्ता लागेना. आणि वडिल म्हणत होते—“ म्हणून मी सांगतो तसे कर. ”

खरे म्हणजे, आताच कशाला ? ही सारी वर्षे वडिलांच्या सांगण्याप्रमाणेच चार्लस करीत आला होता, निदान तशी खटपट तरी करीत होता.

वडिल म्हणाले, "तू असं कर. हे मेडिकल कॉलेज तुला नाही ना जमत ? सोडून दे कसा ! आणि–आणि केंब्रिजला जा तू–"

चार्लसला हे ऐकून काही विशेष वाटले नाही. पण ते पुढे म्हणाले "आणि असं कर. केंब्रिजला बी. ए. झालास की—" ते थांबले. चार्लसला काही कळेना.

आणि ते एकदम म्हणाले "उपाध्या हो तू !"

आता मात्र चार्लसला धक्का बसला. त्याच्या डोळयांसमोर उपाध्याच्या झग्यातील स्वतःची मूर्ति उभी राहिली. कुठल्यातरी खेडयात राहून निमूटपणे धर्माचे कार्य करीत राहण्यास त्याची ना नव्हती. त्याच्या आवडीनिवडी शहरी नव्हत्या. आपली आवड आणि हा उपाध्याचा झगा ! केवडा विसंवाद ! खांद्यावर बंदूक आणि पायघोळ झगा घातलेला उपाध्या लोक कसा काय गोड करून घेणार ? बापरे ! किती भयंकर गोष्ट ! त्याच्या डोळयासमोर बंदूक आणि ससे, फुलपाखरे, हरिणे .... गरगरा फिरत होती.

चार्लस गप्प राहिला.

आपण दिलेली गोळी गिळायला चार्लसला जड जाते आहे हे लागलीच डॉक्टरसाहेबांच्या लक्षात आले. त्यांनी फिरून सुरुवात केली. "नीट विचार कर तू चार्लस. १८–१९ वर्षे झाली तुझ्या वयाला. उंदीर ससे पकडीत रहावयाचे आहे काय जन्मभर ? बंदुकीने चांगला नेम मारता येतो तुला, कबूल ! पण त्याने काय होणार ? आयुष्य फुकट जाईल, त्याचा काय विचार ? हे असेच चालले तर तुझे कसे होणार ? तू काय शिकारी होणार आहेस ? या उनाड उद्योगांनी तुझ्या साऱ्या आयुष्याचे मातेरे होण्याची वेळ आली आहे."

चार्लसला हे पटत होते. वडिलांवर त्याचा विश्वास होता. वडिलांची योजना सर्वस्वी आपल्या मनाविरुद्ध आहे ही एकच गोष्ट त्याला खुपत

होती. अधिक विचार न करता त्याने म्हणून टाकले, "मला कबूल आहे बाबा!"

केंब्रिजला जावयाचे ठरल्याबरोबर ताबडतोब कॉलेजमध्ये नाव घालणे शक्य नव्हते. कारण मेडिकल कॉलेजमध्ये त्याला ग्रीक व भूमिति यांचा अभ्यास करावा लागत नव्हता. तो येथे आवश्यक होता. त्याची पूर्वतयारी केल्याखेरीज केंब्रिजचा अभ्यास जमणार नव्हता. लागलीच या दोन विषयांची तयारी एका खाजगी शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली चालू झाली. प्रगति बेताचीच झाली; पण ती कॉलिजमध्ये प्रवेश मिळविण्याला पुरेशी होती.

उपाध्येगिरीची पूर्वतयारी म्हणून केंब्रिजचा अभ्यासक्रम पूर्ण करून बी. ए. व्हावयाचे ठरले. हा त्याच्या वडिलांचा निर्णय केवळ त्याच्या आवडीनिवडीशी जुळणारा नव्हता असे नव्हे, तर एकूण त्या काळाशी जमणारा नव्हता.

१९ वे शतक म्हणजे स्थूलमानाने व्हिक्टोरिआ राणीची कारकीर्द. १७६९ साली स्टीव्हन्सनचे वाफेचे इंजिन धडधडायला लागल्याला आता चांगलीच साठ वर्षे झाली होती. लवकरच इंग्लंडमध्ये आगगाडी झुकझुक करीत धावणार होती. जहाजे आता वाऱ्यावर अवलंबून न राहता वाफेच्या शक्तीवर सागरावर स्वेच्छेने मुक्त संचार करू लागली होती. निसर्गावर मिळविलेल्या या विजयामुळे आशावाद वाढीस लागला. पारंपारिक विचाराच्या मर्यादा ओलांडून सत्य शोधण्याची वृत्ति बुद्धिवंतांमध्ये मूळ धरू लागली. काही नवीन शोधावे, ज्ञानात भर घालावी, श्रद्धेवर अधिष्ठित असलेल्या गोष्टी तपासून पहाव्यात हा विचार त्या काळी चांगलाच पसरू लागला होता. कोणी सामान्य विद्यार्थी असता तर त्याने आपल्या मनाविरुद्ध एखादा अभ्यासक्रम, तो केवळ फायद्याचा आहे या विचाराने सहज पार पाडला असता. असा विद्यार्थी रुळलेल्या मार्गाने व दाखविल्या दिशेने, न कुरकुरता जातो आणि एका मर्यादित अर्थाने आपल्या जीविताचे

सार्थक करतो. पण आवडीच्या विषयाला सर्वस्व वाहण्याची तयारी असलेल्या चार्लससारख्या तरुणाला हे कसे काय जमणार ?

आपले छंद बाजूला ठेवून उपाध्या व्हावयाचे म्हणजे लोकांची इच्छा, परंपरेची बंधने, उपाध्यायाच्या व्यवसायाची चाकोरी ...... या सगळ्यांनी आपल्याला गुदमरल्यासारखे होणार, या भयानक भविष्याने चार्लसला भेडसावून टाकले.

आता यापुढे केंब्रिजची ही तीन वर्षेच काय ती आपली, या विचाराने त्याचा जीवनक्रम अगदीच बदलून गेला. खांद्यावर बंदूक टाकून रानावनात एकटाच हिंडणारा चार्लस गप्पागोष्टीत रंगू लागला. ख्यालीखुशालीचे जीवन त्याला आवडू लागले. शिकार, संगीत, चित्रकला यात त्याचा पुष्कळ वेळ जाऊ लागला. त्याच्या अनुभवाच्या कक्षा रुंदावल्या. आतापर्यंतचे त्याचे जीवन, तसे म्हटले तर, एकांगी, होते.

हे सारे चालू असताना कर्तव्यबुद्धीने तो अभ्यास तर करीच. अभ्यास जमत नाही म्हणून केंब्रिजनंतर आणखी कोठे आपल्याला पाठविण्याची पाळी आपल्या वडिलांवर येऊ नये, याची त्याने फार दक्षता घेतली. पॅलेच्या Moral Philosophy व Evidences of Christianity या ग्रंथांचे त्याने मनःपूर्वक वाचन केले. परीक्षेच्या पुस्तकांचा अभ्यास इतक्या काळजीपूर्वक त्याने यापूर्वी कधीच केलेला नव्हता. परीक्षेत त्याचा नंबर दहावा आला.



★ ६ ★

# पुढील जीवनाचा पाया

केंब्रिजची परीक्षा पास होणे याला त्याच्या वडिलांनी जरी फार महत्त्व दिले होते तरी त्याच्या स्वतःच्या भावी जीवनाच्या दृष्टीने ती एक क्षुल्लक गोष्ट ठरली. मात्र केंब्रिज येथील काळात त्याने फार चांगले स्नेहसंबंध जोडले. हर्बर्ट या त्याच्या मित्राने त्याला अभिजात संगीताची गोडी लावली; तर व्हिटले या मित्रामुळे तो चित्रकलेत रस घेऊ लागला. उत्कृष्ट चित्र पाहून किंवा दर्जेदार संगीत ऐकून मानवी मनाला जो उदात्ततेचा स्पर्श होतो त्याचा पहिला अनुभव चार्लसला याच काळात आला. विश्वाचे कोडे उलगडण्याच्या दिशेने पुढे त्याने जे पाऊल टाकले, त्याला अशा समृद्ध अनुभवाची खासच जरुरी होती.

या सर्वांपेक्षा जास्त परिणामकारक ठरलेली गोष्ट म्हणजे त्याची प्रो. हेन्स्लो यांच्याशी जडलेली मैत्री ! खरे म्हणजे प्रो. हेन्स्लो व चार्लस यांचे नाते गुरुशिष्याचे ! पण कालांतराने सहवासामुळे, स्वभाव आवडीनिवडी यांच्या संवादाने, हे गुरुशिष्य एकमेकांचे जीवश्च-कंठश्च स्नेही झाले. हे प्रोफेसरसाहेब वनस्पतिशास्त्रावर व्याख्याने देत. तोच त्यांचा विषय. त्यांची व्याख्याने ऐकण्याची चार्लसला संधी मिळाली. आणि त्यावेळेपासून त्याच्या मूळच्या छंदाला चांगली डेरेदार पालवी फुटली. त्याच्या केंब्रिजच्या अभ्यासक्रमाशी वनस्पतिशास्त्राचा काहीच संबंध नव्हता. पण अभ्यासाच्या दडपणाखाली त्याची मूळची आवड जी अजिबात चेपून जात होती, ते टळले. त्याचा वनस्पती शास्त्राशी संबंध आला आणि तो टिकून राहिला.

जीवनाला वळण लावणाऱ्या गोष्टी क्षुल्लक असतात. त्याचे महत्त्व भविष्यकाल ठरवितो. चार्लसच्या प्रो. हेन्स्लो यांच्याशी झालेल्या भेटीबावत असेच म्हणता येईल. चार्लसचे जीवन प्रार्थनामंदिराच्या वळणाने जाणार होते. त्याला संशोधकाच्या प्रयोगशाळेचा रस्ता दाखविण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य प्रो. हेन्स्लो यानी केले. चार्लसच्या जीवनात या प्रोफेसरसाहेबांना फारच महत्त्व आहे.

प्रो. हेन्स्लो म्हणजे खराखुरा ज्ञानयोगी! आठवड्यातून एकदा ते आपल्या घरी शास्त्रज्ञ, प्राध्यापक, होतकरू विद्यार्थी यांचा मेळावा भरवीत. त्या दिवशी या सर्वांना मुक्तद्वार असे. या मेळाव्यात चार्लस सामील झाला. चर्चा, शंकानिरसन, विद्वानांचा सहवास आणि महत्त्वाचे म्हणजे प्रो. हेन्स्लो यांचे मार्गदर्शन. चार्लच्या स्वप्नीही नसेल अशी उत्कृष्ट संधी त्याला मिळाली. संशोधनाची आवड असलेल्या तरुणांना जर अशी संधी वेळीच मिळाली नाही तर कालांतराने त्यांची आवड, बुद्धि, जागच्या जागीच खुरटून जाते, विरून जाते. चार्लसच्या सुदैवाने त्याचे असे झाले नाही.

प्रो. हेन्स्लो यांच्या आवडीचे विषय विविध! वनस्पतिशास्त्र, भूस्तरशास्त्र, खनिजशास्त्र व रसायनशास्त्र हे सारेच त्यांच्या अभ्यासाचे विषय. त्याकाळी या शास्त्रांची प्रगति आजच्या इतकी झालेली नसल्यामुळे एखाद्याला असा अष्टपैलूपणा साधत असे.

त्यांच्याच सांगण्यावरून चार्लसने सेजविक या भूस्तर शास्त्रज्ञाबरोबर कांही काळ काम केले. या काळात श्रूस्बेरी येथे रेतीच्या खाणीत एक शिंपला सापडला. चार्लसला कोडे पडले, हा शिंपला येथे कसा आला. सेजविकनी हा प्रश्न उडवून लावला. ते म्हणाले, "टाकला असेल कोणीतरी!" समाधानकारक उत्तर सापडेपर्यंत चार्लसला चैन पडत नसे. त्याच्या याच गुणामुळे त्याच्या हातून पुढे एवढे कार्य झाले. त्याला आश्चर्य वाटले की सेजविक यांच्या सारखा शास्त्रज्ञ असा

महत्त्वाचा प्रश्न सहजासहजी उडवून कसा लावू शकतो? नंतरच्या संशोधनात असे आढळून आले की फार प्राचीन काळी हिमनद्यांनी वाहून आणलेला हा शिंपला मूळचा उत्तर ध्रुव प्रदेशातील होता.

प्रो. हेन्स्लो यांनी चार्लसला भूगर्भशास्त्राच्या अभ्यासाला लावले, त्याचा त्याला फार मोठा फायदा झाला. निरीक्षणात आलेल्या एकूण गोष्टींची वर्गवारी करणे, त्यांचे व्यवस्थित टिपण ठेवणे, सर्वमान्य नियमात बसणाऱ्या गोष्टी कोणत्या, न बसणाऱ्या कोणत्या ते ठरविणे, पूर्वग्रह बाजूला ठेवून शास्त्रीय, निर्भेळ सत्य हुडकून काढण्यासाठी चिकाटीने प्रयत्नांची पराकाष्टा करणे, या साऱ्या गोष्टींची त्याला सवय लागली आणि ही सवय त्याच्या हातून पुढे होणाऱ्या महान् संशोधनाला फारच उपयुक्त ठरली.


प्रोफेसरसाहेबांच्या बरोबर फिरण्यात चार्लसचा कितीतरी वेळ जाई, म्हणजेच कारणी लागे. चार्लस लोकांच्या दृष्टीस पडे तो या प्रोफेसर-साहेबांबरोबरच. त्याला लोक म्हणू लागले, "प्रो. हेन्स्लो यांची सावली!" मोठ्या झाडाच्या सावलीत रोपे जीव धरीत नाहीत, ती खुरटतात. पण येथे मात्र या रोपाने चांगलेच मूळ धरले आणि पुढे त्याने भव्य वृक्षराजाचे डेरेदार रूप धारण केले.

कीटकांचा संग्रह करून त्यांचा अभ्यास करणारा चार्लस आपल्या कामात किती रंगून जात असे! एका ठिकाणी त्याला तीन कीटक दिसले, पूर्वी कधीच न पाहिलेल्या जातीचे! झाले, त्यांना पकडण्याचा चार्लसने निश्चय केला. एका हातात त्याने एक कीटक पकडला, दुसऱ्या हातांत दुसरा. आता तिसरा कसा पकडणार? एक हात मोकळा करण्यासाठी त्याने हातांतील कीटक सरळ तोंडात ठेवून दिला. तीनही कीटक पकडण्याचे काम यशस्वी झाले खरे; मात्र त्यासाठी त्याला भलतीच किंमत द्यावी लागली. तोंडातल्या कीटकाने तेथेच 'विधी' केला! त्यामुळे चार्लसचे तोंड सुजून आले. इतके होत होते तरी त्याने कीटकांना हातातून—आणि तोंडातूनही—निसटू दिले नाही.

आपल्या आवडीचे हे काम करीत असतांनाच त्याचे मन पाखरणारा भुंगादेखील आपले काम करीतच होता. उपाध्या झाल्यावर हे कसे काय जमणार ?

त्याकाळी ' मस्तिष्क शास्त्र ' म्हणून एक ' शास्त्र ' बरेच लोकप्रिय झाले होते. एखाद्याच्या डोक्याचे उंचवटे पाहून त्याची आवडनिवड, त्याचे सामर्थ्य वगैरे संबंधी अंदाज बांधणाऱ्या या शास्त्रासंबंधी लोकांत बरेच कुतुहल निर्माण झाले होते. आपल्या वृद्धापकाळी लिहिलेल्या आत्मचरित्रात चार्लस डार्विननी लिहिले आहे, ' जर मस्तिष्क शास्त्रावरच विश्वास ठेवायचा झाला तर दहा उपाध्यायांना पुरून उरतील इतके उंचवटे माझ्या एकट्याच्या डोक्यावर या मस्तिष्कशास्त्रज्ञांना सापडले असते ! '

प्रो. हेन्स्लो यांचे प्रोत्साहक मार्गदर्शन आणि त्यामुळे त्याने स्वतः केलेल्या परिश्रमाचे झालेले चीज त्याला लवकरच पहावयास मिळाले. वनस्पतिशास्त्रास वाहिलेल्या एका ब्रिटिश मासिकात त्याने जमविलेल्या कीटकांची चित्रे प्रसिद्ध झाली. त्याचे नाव छापून आले. त्याला हुरूप आला. उपाध्याचा झगा तसाच खुंटीवर ठेवता आला तर !....



★ ७ ★

# संशोधक डार्विन

संशोधनाला वाहून घेण्याची त्याची इच्छा पूर्ण झाली, पण अगदीच अनपेक्षित रीतीने!

वनस्पती व प्राणी यांचा अभ्यास करण्यासाठी जगभर फिरावयास मिळाले किती बहार होईल! हा विचार चार्लसच्या मनात नेहमी डोकावत असे. एकतर त्यामुळे उपाध्येगिरीची कटकट टळेल, दुसरे म्हणजे आवडीचे काम करावयाला मिळेल.

इंग्लंडच्या कित्येक व्यापाऱ्यांची जहाजे त्यावेळी जगभर फिरत. त्यांच्या मालकांना त्याने पत्रे लिहिली. आज उत्तर येईल, उद्या येईल, अशी वाट पाहून तो दमला. शेवटी एकही होकार आला नाही तो नाहीच.

आणि एक दिवस इ. स. १८३१ मध्ये त्याचे गुरु प्रो. हेन्स्लो यांचे पत्र आले.

**"...ब्रिटिश नौदलाचे एक जहाज नकाशे दुरुस्त करून घेण्यासाठी जगप्रवासाला निघणार आहे. या जहाजावर एक जीवशास्त्रज्ञ ते घेऊ इच्छितात. या कामासाठी पगार मिळणार नाही."**

"पगार मिळणार नाही" याचे चार्लसला काहीच वाटले नाही. आपल्याला आवडते काम करण्याची संधी मिळते आहे याचाच त्याला आनंद झाला. संधी आपण होऊन दाराशी चालत आलेली होती. आता प्रश्न उरला वडिलांच्या परवानगीचा. चार्लसने ठरविले; 'विचारून तर पाहू या.'

चार्लस श्रूस्बेरी येथे गेला.

येण्याचे कारण सांगताक्षणीच त्याच्या वडिलांची चर्या पालटली. त्यांच्या मते चार्लसला उपाध्येगिरी पलिकडे दुसरे काहीच जमण्यासारखे नव्हते. त्यांनी त्याची चांगली उलटतपासणी घेतली आणि आपला विरोध मुद्देसूदपणे मांडला.

त्यांच्या मते या सफरीत चांगली पाचसहा वर्षे जाणार. आणि हाती काय पडणार? कुणास ठाऊक! मग उपाध्या होण्याचे काय? जहाजावरील ही जीवशास्त्रज्ञाची नोकरी अनेकांनी नाकारलेली असणार. त्याअर्थी त्यात काही फायदा तर नसणारच, उलट तोटाच असणार. चार्लससारख्या बावीस वर्षे वयाच्या तरुणाने पुढील जीवनातील स्थैर्याची तरतूद आताच करावयास हवी. हीच महत्त्वाची वर्षे. ती अशा भटकंतीत आणि प्रयोगादाखल फुकट घालविली म्हणजे मग राहिले काय?...इतके करून जहाजावरील जीवन ते! सुखाचे नाव नको... चार्लसच्या वडिलांच्या मते जहाजावरील ही नोकरी स्वीकारणे म्हणजे शुद्ध वेडेपणा होता.

शेवटी त्यांनी सांगितले, " ही नोकरी स्वीकारण्याचा सल्ला देणारा एक जरी समंजस मनुष्य तू माझ्याकडे आणलास तरी मी परवानगी देईन."

परिणामकारक रीतीने कोणतीही गोष्ट मांडली की चार्लसला ती ताबडतोब पटू लागे. आताही असेच झाले. वडिलांचे आक्षेप तर खोडून काढता येत नाहीत आणि फिरतीच्या नोकरीचे आकर्षण तर जबरदस्त! अशा अवस्थेत तो सरळ आपल्या आजोळी गेला. आपल्या मामांना त्याने सारी हकीगत सांगितली. त्याच्या वडिलांचे मन वळविण्याचे काम मामांनी आपल्या अंगावर घेतले. तात्पुरता का होईना, पण चार्लसचा जीव भांड्यात पडला.

मामांनी लगेच गाडी जुंपली. चार्लसला घेऊन ते श्रूस्बेरी येथे आले. त्यांनी डॉ. रॉबर्ट यांचे मुद्दे खोडून काढले.

चार्लसने उपाध्या व्हावयाचे ठरविले आहेच. पांचसहा वर्षे मध्ये जातील इतकेच. पण त्यासाठी मनाची हौस का मारावी ?....स्थैर्य, स्थैर्य म्हणजे काय ? त्याची इतक्या लहान वयात काळजी करण्याचे काय कारण ? जहाजावरील जीवन हालअपेष्टांचे असले म्हणून काय झाले ? सौख्याच्या मागे धावायला चार्लसचे असे काय वय झाले आहे थोडेच ? तो सफरीवर गेला तर त्याला त्याच्या आवडीचे काम करायला मिळेल. जाऊ द्या त्याला. यात तोटा तर निश्चितच नाही. झाला तर फायदाच आहे. तुम्ही म्हणता ही नोकरी अनेकांनी नाकारलेली आहे. पण असे समजण्यास पुरावा काय ? त्याचे नाव थोड्याबहुत का होईना, पण विद्वानांच्या कानी गेलेले आहे. त्याचमुळे त्याला ही संधी मिळत असेल ! ...

चार्लसच्या वडिलांना हे सारे पटले. चार्लसच्या मार्गातील एक मोठी अडचण दूर झाली. आता आणखी एक अडचण होती. ती म्हणजे प्रकृतीची ! अलीकडे त्याच्या छातीत कळा येत. डॉक्टरकडे गेले तर एखादे वेळी तो सांगायचा ' तुम्हाला हृदय विकार आहे ' म्हणून ! म्हणजे आटोपलाच कारभार ! मग कसली सफर आणि कसले संशोधन ! चार्लसने ठरविले सध्या डॉक्टरकडे जाऊन हात दाखवून अवलक्षण करून घ्यावयाचे नाही. त्याने छातीतील कळा छातीतच कोंडून ठेवल्या, त्यांना तोंडावाटे वाट फुटू दिली नाही. तो पुढील मार्गाला लागला.

आता जहाजाच्या कॅप्टनची गाठ घेऊन पुढील गोष्टी ठरवायच्या !

चार्लस ज्या जहाजातून सफरीवर जाणार होता त्याचे नाव होते '**बीगल**'. त्याचे कप्तान फिट्झरॉय हे मोठे उमदे पण चमत्कारिक स्वभावाचे गृहस्थ होते. माणसाच्या नाकाच्या लांबी-रुंदी-आकारावरून त्याचा स्वभाव काय असावा याचे त्यांनी काही आडाखे बांधले होते. शास्त्रज्ञाचे नाक म्हणे लांब, सरळ, टोकदार असायला हवे. पण चार्लसचे

नाक असे मुळीच नव्हते. त्यांना प्रश्न पडला अशा नाकाचा माणूस शास्त्रज्ञ कसा काय असू शकेल बुवा ?

असे जरी होते तरी चार्लसच्या नाकाने त्याला दगा दिला नाही. जीवशास्त्रज्ञ म्हणून त्याला जहाजावर घेण्याचे फिट्झरॉय यांनी मान्य केले.

वडिलांचा आणि भावाबहिणींचा निरोप घेऊन चार्लस सफरीवर निघाला. ही संधी आपल्याला मिळेल की नाही, मिळाल्यास आपल्याला घेता येईल की नाही, अशा शंकाकुशंकांनी त्याला घेरले होते. त्या सर्वांचे निराकरण होऊन तो बीगल जहाजावरील आपल्या केबिनमध्ये येऊन दाखल झाला. फिट्झरॉय यांच्याच केबिनमध्ये त्याला जागा मिळाली होती. आता पुढील चारपाच वर्षे मनासारखे काम करायला मिळणार याचा आनंद, स्वकीयांपासून व मित्रांपासून दूर राहण्याचे दुःख, आपल्या कार्यात यश कितपत येणार यासंबंधी भेडसावणारा संदेह....शेंकडो संमिश्र विचारांनी त्याच्या डोक्यात गर्दी करून सोडली.

त्यातच जहाज हाकारण्याच्या दिवशी हवा भलतीच वाईट होती. चार्लसला भीति पडली, आता जहाज सुटते की नाही! त्याला समुद्रप्रवासाचा अनुभव कधीच नव्हता. पण कप्तानसाहेब चांगले मुरलेले दर्यावर्दी होते. वादळी हवेने ते जरा सुद्धा विचलित झाले नाहीत.

'बीगल' जहाजाचा आखलेला मार्ग असा होता : दक्षिण अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील रिओ डी जॅनीरो, मॉंटे व्हिडीओ, फॉकलंड बेटे यावरून टिएरा डेल फ्यूगो, नंतर दक्षिण अमेरिकेच्या दक्षिण टोकाला वळसा घालून व्हाल पारेसो, लिमा घेऊन गॅला पॅगोस या बेटांकडे जावयाचे, तेथून सोसायटी बेटांवरून न्यूझीलंड, सिडनी, किंग जॉर्ज साऊंड, कोकोस बेटे, केपटाऊन, सेंट हेलेना, असेन्शिअनवरून इंग्लंडला परत! (पहा बरं नकाशावरून हा मार्ग!)

शास्त्रज्ञाचे तरतरीत नाक नसलेला चार्लस आपले कार्य कसे काय करणार याविषयी प्रथमतः फिट्झरॉय यांना जरा शंकाच होती. चार्लस

आपल्या घरी बहिणींना, प्रो. हेन्लोंना व इतर शास्त्रज्ञांना पत्रे पाठवी. त्यामध्ये त्याच्या एकूण निरीक्षणांची नोंद असावयाची. हे कागद जेव्हा कप्तानसाहेबांनी नजरेखालून घातले तेव्हा त्यांना समाधान वाटले.

जहाजावरील जीवन सुखाचे नव्हते. किनाऱ्याला जहाज नांगरून पडले, की नकाशे दुरुस्त करणारे लोक आपल्या कामाला लागत. चार्लस कधी घोड्यावरून, खेचरावरून तर कधी पायीच चालू लागावयाचा. विषुववृत्तावरील उष्ण हवा. कधी कधी तहानेने व्याकूळ होऊन तासन् तास पाण्याच्या शोधात जावयाचे. पण त्याने आपले कार्य चिकाटीने चालूच ठेवले. वनस्पती, प्राणी, दगड, यांचा संग्रह चालूच राहिला. जरूर तर तो प्राण्यांचे शवविच्छेदनही करी. शिवाय भूस्तरांचे निरीक्षण! इतकी सगळी कामे एखाद्या तपस्व्याच्या एकाग्रतेने तो करावयाचा. प्रकृति धडधाकट नसतांना हे सारे करावयाचे म्हणजे केवढी चिकाटी पाहिजे! केवढी निष्ठा पाहिजे!

त्यांतच कधी कधी कप्तानसाहेबांशी साध्या बोलण्यात वादाचे वादळ व्हावयाचे. एकदा सहज बोलता बोलता गुलामगिरीचा विषय निघाला. याच गुलामगिरीच्या मुद्यावर आणखी तीस वर्षांनी अमेरिकेत यादवी युद्ध लढले जाणार होते. गुलामांचा व्यापार त्याकाळी जोरात होता. कोणताही सुसंस्कृत मनुष्य गुलामगिरीला विरोध करी. इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये गुलामगिरी नष्ट करणारा कायदा पास करण्याचे वातावरण तयार होत होते. अशा स्थितीत चार्लस सहज बोलून गेला, "गुलामगिरी म्हणजे वाईटच!" सौम्य स्वभावाच्या चार्लसला ज्या कोणत्या एका गोष्टीचा तीव्र संताप येत असेल तर ती म्हणजे गुलामगिरी!

झाले फिट्झरॉय यांचे माथे भडकले. ते नेहमीच मुलखावेगळ्या मतांचा पाठपुरावा करीत. त्यांनी विचारले,

"म्हणजे कशी काय? गुलामगिरीतून मुक्त होण्याची संधी दिली असताना देखील त्या संधीचा फायदा न घेणारे गुलाम मी पाहिले आहेत."

" पाहिले आहेत ? " चार्लसने विचारले.

" होय, पाहिले आहेत. म्हणजे खात्रीलायक माणसाकडून ऐकले आहे "—फिट्झरॉय.

" धन्याच्या समोरच ' मला मोकळे व्हावयाचं आहे ' असे म्हणायला कोणाही गुलामाला भीतीच वाटेल. तो खरे बोलायला कसा धजेल ? "

" म्हणजे ? " फिट्झरॉय भडकले. " म्हणजे माझ्यावर तुमचा विश्वास नाही ? परस्पराविषयी अविश्वास दाखविणाऱ्या दोन व्यक्ती एका कॅबिनमध्ये राहू शकत नाहीत. उचला आपले बिऱ्हाड येथून ! "

चार्लसला भीती वाटली, आता आपल्याला चंबूगवाळे उचलून येथून पाय काढावा लागणार की काय ! अपमानास्पद वागणुकीचीही त्याला चीड आली. पण उलटून बोलून शब्दाला शब्द वाढविणे त्याच्या स्वभावात नव्हते. तो गप्प राहिला.

आज कप्तानसाहेबांचा नूर कसा काय आहे हे कळण्यासाठी सकाळी उठल्याबरोबर जहाजावरील लोक एकमेकांना विचारीत, " काय, आज कॉफी कशी काय आहे ? थंड की उकळती ? "

तसेच या दिवशी कोणीतरी विचारले. त्याला उत्तर मिळाले " उकळती. "

पण कप्तानसाहेब जेवढे विक्षिप्त व तऱ्हेवाईक तितकेच उमद्या स्वभावाचे होते. थोड्याच तासांनी शांत झाल्यावर त्यांना आपला वेडेपणा कळून आला. त्यांनी लागलीच चार्लसची माफी मागितली आणि त्यांच्या कॅबिनमधील चार्लसचे बिऱ्हाड हलण्याचे टळले !

जहाजावरील हे वादळ शेवटचेच ठरले. फिट्झरॉय यांच्या मनात चार्लसबद्दलचा आदर वाढत गेला. तो घरी जे वृत्तांत पाठवी त्यातल्या शब्दाशब्दामागे त्याने केलेले परिश्रम स्पष्ट दिसावयाचे. शास्त्रज्ञ, संशोधक म्हणून ते चार्लसला अधिकाधिक मानू लागले.

... शाखा.
क्रमांक ... नोंद दि. ...



# डार्विनची तपःसाधना

जहाजावर बोलणी चालली होती. "आता आपले जहाज फ्युएगो बेटाला लागणार!" काही तासांनी जहाज किनाऱ्याला लागले! हातात लेखनसाहित्य पाव व विच्छेदनाची शस्त्रे यांनी भरलेली बॅग, डोक्यावर हॅट, खांद्यावर बंदूक अशा थाटात चार्लसने जमिनीवर पाऊल ठेवले. कडक ऊन पडले होते. पायाखाली तापलेली जमीन! पण तो तसाच पुढे जात राहिला. जंगलाचा भाग लागल्यावर तो सावधपणे चालू लागला. खांद्यावर बंदूक टाकून रानावनातून हिंडण्याचा त्याला सराव होता. उन्हातून तासन्‌तास चालल्यामुळे त्याला तहान लागली. पण त्याचे लक्ष सभोवती दिसणाऱ्या दृश्यावर खिळले होते. एका झाडाखाली सावलीत तो बसून राहिला.

सभोवती पसरलेल्या झाडांची पालवी, फुले, पक्षी, या साऱ्यांचेच रंग मळकट! त्यात मुळीच तजेलपणा दिसत नव्हता. वास्तविक उष्ण-कटिबंधांतील या बेटांवरील प्राण्याफुलांचे रंग भडक असावयास हवेत. चार्लसला प्रश्न पडला, हे असे कसे? विचारांती त्याने निष्कर्ष काढलाः उष्णकटिबंधांतील प्राण्यांना भडक रंग मिळतात ते उष्णता किंवा स्वच्छ, झगझगीत सूर्यप्रकाशामुळे नव्हे तर त्यांना मिळणाऱ्या स्वास्थ्यामुळे. या बेटावरील जीवन स्वास्थ्याचे नाही. म्हणून येथे रंग मळकट. त्याला समाधान वाटले की अपुऱ्या निरीक्षणामुळे निर्माण झालेला एक गैरसमज आज आपण दूर केला.

त्याला तहान लागली. पाण्याच्या शोधार्थ तो उठणार इतक्यातच त्याला त्या नीरव अरण्यात पक्ष्यांची कुजबुज ऐकू आली. त्याच्या

आतापर्यंत लक्षात आले नव्हते की आपल्या सभोवती आपल्या अगदी जवळून पक्षी उडत आहेत. हे मळकट रंगाचे पक्षी त्याला मुळीच भीत नव्हते. एक तर सरळ त्याच्या खांद्यावर येऊन बसला. त्याच्या मनात आले, मूलतः या पक्ष्यांना माणसाची भीती नसते. मनुष्य त्यांना मारू लागल्यावर त्यांच्या मनांत भीती उत्पन्न होते. त्याला कळून चुकले की आपण सर्वस्वी भिन्न अशा जगात येऊन पोचलो आहोत.

जवळच झाडीत खसफस झाली. सराईत शिकाऱ्याच्या नजरेने त्याने न भिता त्या दिशेकडे पाहिले. आणि काय आश्चर्य ! त्याच्यापुढे काही अंतरावर एक नग्न रानटी माणूस उभा होता. येथे नरभक्षक आहेत म्हणून चार्लसने ऐकले होते. तोच हा नरभक्षक !

सुधारता सुधारता माणूस आजच्या अवस्थेला आला आहे. त्याचा हा पूर्वज पाहताना चार्लसला मोठी गंमत वाटली. या अनुभवाचे वर्णन आपल्या वहिणीला लिहिलेल्या पत्रात त्याने असे केले आहे :

" आम्ही फ्युएगो बेटातील एक रहिवाशी पहिला. मुळीदेखील न माणसाळलेला माणूस पाहणे म्हणजे जगांतील एक मोठी आश्चर्यकारक गोष्ट आहे. रानटी प्राणी व माणसाळलेला प्राणी यांच्यात तसा फरक फारच थोडा आहे. पण माणसाच्या बाबतीत मात्र हा फरक मोठा वाटतो....या नग्न माणसाचे शरीर रंगविलेले आहे. त्याच्या हावभावावरून तो आपल्याशी गोडीने घेणार की आपल्याला गिळंकृत करणार याचा काहीच पत्ता लागत नाही.....नंतर माझ्या कानी आले की हे नरभक्षक हिवाळ्यात बायकांना मारून खातात. माझा प्रथम विश्वास बसला नाही. पण सील मासे पकडणाऱ्या जहाजावरील कप्तानाने मला जे सांगितले त्यावरून हे खरे आहे असे वाटते. हे लोक आपल्या कुत्र्यांना मारण्याऐवजी बायकांनाच ठार मारून खातात. का, तर म्हणे कुत्रा उपयोगी असतो. बायकांचा काहीच उपयोग नाही...या रानटी लोकांचा आवाज ऐकला तरी किळस येते ! "

चॅथॅम बेटासभोवती चार्लसच्या वीगल जहाजाने फेरी मारली. किती विचित्र दृश्य दिसले चार्लसला या बेटावर! येथे पन्नास ते शंभर फूट उंचीचे सुळकेच सुळके सगळीकडे पसरलेले होते. एकेकाळचे हे आग ओकणारे ज्वालामुखी! आता मात्र थंड होऊन स्वस्थ झोप घेत होते. तरी देखील डोंगरावरील एका सुळक्यातून गिरणीच्या धुराड्यासारखा धूर येतच होता !

यातून मार्ग काढीत चार्लस किनाऱ्यापासून बेटांच्या मध्याकडे जाऊ लागला. काही अंतरावर दोन कासवे फरफटत चालली होती. अगदी मळलेल्या वाटेने. त्यांचा हा नेहमीचाच रस्ता होता. चार्लसला तहान लागली होती. पाणी कुठे मिळते याचा शोध खरे म्हणजे, त्याने अगोदर करावयाला हवा; आणि मग बसायचे या कासवांकडे पहात. पण तो आपला त्यांच्यामागून जात राहिला. दोनदोनशे पौंड वजनाचे हे प्राणी सावकाश चालले होते; गंमत म्हणून चार्लस एका कासवावर बसला. त्या बेट्याला त्याचे काहीच वाटले नाही. ते आपले पूर्वीप्रमाणेच चालत राहिले.

कासवामागे जाता जाता त्याला कळून आले की आपण एखाद्या ओढ्याकडे किंवा सरोवराकडे जात आहोत. किनाऱ्याकडून जाणारी कासवे याच पाण्यावर येत. जरा वेळाने कासवांबरोबरच तो एका झऱ्याशी येऊन पोचला. पाणी आपले गुळमट आणि गढूळच. तहान भागवायला ठीक होते इतकेच.

असाच एकदा तो कासवांच्या तांड्याबरोबर चालला होता. कासवांबरोबर गेले की आपण पाण्याशी येतो हा त्याचा अनुभव! एक डोंगर चढून गेल्यावर डोंगरांनी वेढलेले एक स्वच्छ पाण्याचे सरोवर त्याला दिसले. तहानलेल्या माणसाची तहान अशा पाण्याच्या दर्शनाने देखील निवावी इतके स्वच्छ, स्फटिकासारखे पाणी. जवळ जाऊन त्याने या पाण्याची एक चूळ भरली मात्र! थू थू करून त्याने ते थुंकून टाकले.

इतके खारट होते ते! पाण्याची खोली चारच इंच होती. त्याच्या खाली स्वच्छ, पांढऱ्या मिठाचा थर पसरलेला होता. बेटावरील कासवांची शिकार करून त्यांचे मांस खारविण्यासाठी स्पॅनिश लोक या तळ्याचे मीठ वापरीत.

वाळवंटातून प्रवास करताना अरब जसे आपल्या उंटाला कापून त्याच्या पोटातील पाणी पितात तसेच येथेही लोक करतात. मात्र येथे कासवांना मारतात. चार्लसने एकदा कासवाच्या पोटातील पाणी चाखून पाहिले. किंचित खारट लागले त्याला ते.

हे अजस्र प्राणी बहिरे असतात. अगदी त्यांच्या जवळून चालले तरी त्यांना त्याची दाद नसते. त्यांच्या पुढेच जाऊन उभे राहिले तर आपली डुकली आत घेतील आणि फुस्फुस् करीत राहतील. त्यांचे चालणे म्हणजे फरफटणे. तरी देखील अशा मंद चालीने दिवसाकाठी ते आठ मैलांचा पल्ला सहज गाठतात. इसापनीतीतल्या सशाला उगाच नाही कासवाने हरविले! एकदा पाण्याशी पोचले की कासव खूप पाणी पिऊन घेते, तेथेच आसपास दोनचार दिवस काढते, की चालले फिरून किनाऱ्याकडे!

याच बेटांवरील दुसरा महत्त्वाचा प्राणी म्हणजे घोरपड. या दोन प्रकारच्या असतात. जमिनीवर राहणाऱ्या व कधी जमिनीवर तर कधी पाण्यात राहणाऱ्या. पाण्यांतील घोरपडी इतक्या सफाईने पोहतात की जणू काही मगरीच! चार्लसने उत्क्रांतीचे तत्त्व विशद करताना या घोरपडींचे उदाहरण घेतले. मूळचे जलचर प्राणी पाण्यातील शत्रूंच्या भीतीने जमिनीवर कसा आश्रय घेतात याचे हे एक उदाहरण म्हणून त्याने दिले.

जमिनीवरील घोरपडी बिळे करीत ती अगदी जमिनीलगत. जमीन उकरण्याची त्यांची रीत चमत्कारिक. एकदा एकाच बाजूच्या पुढील व

मागील पायाने उकरीत रहावयाचे. हे पाय दमले की मग दुसऱ्या बाजूच्या पायांनी सुरुवात करावयाची. या घोरपडी दिसावयाला अगदीच ओंगळ दिसतात.

१८३१ च्या डिसेंबरमध्ये सुरू झालेली सफर आता परतीच्या मार्गावर होती. आज जवळजवळ चार साडेचार वर्षे चार्लसची ही ज्ञानोपासना चालू होती. ऊन, वारा, वादळ, पाऊस, तहान, भूक, अशक्त प्रकृति या सर्वांना न जुमानता त्याने आपली साधना अखंडपणे चालू ठेवली. प्रवालनिर्मित बेटे कशी अस्तित्वात आली, गॅलापॅगोस बेटांच्या समूहावरील प्राणी व वनस्पती यांचा इतरत्र आढळणाऱ्या वनस्पती व प्राणी यांच्याशी संबंध कोणता.......कित्येक प्रश्नांचा त्याने अभ्यास केला. वनस्पती, प्राणी, कीटक यांचा संग्रह केला. त्यावर केलेल्या संशोधनाची टिपणे काळजीपूर्वक तयार केली.

आणि असेन्शिअन बेटावर असताना इंग्लंडहून त्याच्या बहिणींचे पत्र आले. या पत्रातील एका वाक्यावर चार्लसची नजर खिळून राहिली. त्याने ती ओळ वारंवार वाचली. त्याला कोडे पडले, ' हे कसे झाले ? ' बहिणींनी लिहिले होते, " प्रो. सेजविक आपल्या घरी आले होते. ते बाबांना म्हणाले, तुमचा चार्लस लवकरच शास्त्रज्ञांच्या पहिल्या रांगेत जाऊन बसणार ! "


लवकरच त्याला समजले की प्रो. हेन्स्लो यांना आपण लिहिलेली पत्रे त्यांनी केंब्रिजच्या फिलॉसॉफिकल सोसायटीच्या सदस्यांपुढे वाचून दाखविली आणि काही छापवून खाजगी रीत्या वाटली. त्याने त्यांच्याकडे हाडांचे खडकावर उमटलेले ठसे पाठविले होते तेही त्यांनी लोकांना दाखविले.

पत्र वाचल्याबरोबर चार्लसच्या डोळ्यांसमोर आपल्या गुरुजींची मूर्ति उभी राहिली. प्रो. हेन्स्लो ! या ज्ञानमहर्षींनी त्याला वनस्पतिशास्त्र व भूस्तरशास्त्र यांच्या अभ्यासाची प्रेरणा दिली. त्यांनीच चार्लसच्या पुढे

बीगलवरील संशोधकाची नोकरी आणून ठेवली. सफरीवरील त्याचे संशोधनकार्य इंग्लंडमध्ये विद्वानांपुढे ठेवणारे देखील तेच. जणू त्याना स्वतःला जे करावयाचे होते ते त्यानी आपल्या चार्लसकडून करवून घेतले. त्याला आठवण झाली. आपल्याला लोक " प्रो. हेन्स्लो यांची सावली " म्हणत. आपण किती विविध अर्थांनी आपल्या गुरुजींची सावली ठरलो आहोत असा विचार त्याच्या मनात आला.

कीर्तीचा मार्ग त्याच्यासमोर पसरलेला होता. कीर्तीमंदीर आता फार दूर नव्हते. लायल, हूकर, प्रो. हेन्स्लो, या विद्वानांना आपले कार्य मान्य झाले आहे, जन्माला येऊन माणसाने आणखी विशेष ते काय साधावयाचे असा विचार त्याच्या मनात आला. जहाजावरील लोक गमतीने त्याला "माशी पकड्या" म्हणत. पण आता तो जगातील शास्त्रज्ञांच्या पहिल्या रांगेत जाऊन बसणार होता.

साडेचार वर्षांच्या दगदगीच्या सफरीनंतर चार्लस घरी परतला !



**प्राणि प्रस्तरावशेष ( Fossil )**

हजारो वर्षे खडकात दबून राहिलेल्या पुरातन प्राण्याच्या सांगाड्याचा ठसा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. बालसाहित्य शाखा
अ. क्र. ... वि ...
क्रमांक ... नोंद दि. ...

* ९ *

# विवाह आणि वैवाहिक जीवन

पुढील दोन वर्षे भरगच्च कार्यक्रमाची गेली. एकतर श्रूस्बरी, मेर, केंब्रिज व लंडन यांमधील फेऱ्या व दुसरे म्हणजे विविध शास्त्रीय विषयांवर प्रबंध लिहून ते निरनिराळ्या मंडळांत वाचून दाखविणे.

असे जरी होते तरी वेळात वेळ काढून संशोधन कार्याबरोबरच वर्डस्वर्थ व कोलरिज यांचे काव्य वाचण्यासाठी दिवसातील काही तास न चुकता तो बाजूला काढून ठेवी.

बीगल जहाजावरील संशोधकाच्या एकाकी जीवनानंतर या दोन अडीच वर्षांतले त्याचे जीवन एकदम निराळे झाले. लोकांमध्ये त्याची उठबस वाढली. तरीदेखील वनस्पती व प्राणी यांच्या सहवासात आतापर्यंतचे सारे आयुष्य घालविलेल्या चार्लसला गप्पा मारणे तितकेसे जमले नाही. बकल नावाच्या इतिहासकाराशी त्याच्या गप्पा चालू होत्या. चार्लस उठून गेल्यावर हे इतिहासकार हळूच कुजबुजले, “ डार्विनचे लेखन त्याच्या संभाषणापेक्षा खूपच चांगले असते ! ”

चार्लस आता वयाने, विद्येने व मान्यतेने मोठा झाला. आता आपण त्याचा उल्लेख एकवचनी करणे चूक होईल. त्यांचे महत्त्व व मान्यता वाढत होती. सर्वांत महत्वाचे म्हणजे ही त्यांची मान्यता त्यांची भावी पत्नी एमा वेजवुड यांनाही आकर्षक वाटत होती.

त्यांच्या आजोळच्या घराण्यातील एमा वेजवुड यांच्याबद्दल कित्येक दिवस डार्विन यांच्या मनात कोमल प्रेमभावना निर्माण झालेली होती. तशीच एमा वेजवुड यांच्याही मनात डार्विनविषयी ! सफरीवरून परत

आल्यावर मेर येथें डार्विनना मेजवानी झाली. एमा वेजवुड यांना डार्विन यांचे बोलणेचालणे सारेच आवडले. थोड्याच दिवसांत डार्विननी आपल्या प्रेयसीला लग्नासंबंधी विचारले. होकार मिळाला, डार्विनना आकाश ठेंगणे झाले.

जीवजातींच्या उत्पत्तीचा विचार करता करता डार्विन यांची एक गोष्ट राहून गेली होती. ती म्हणजे स्वतःच्या महान गुणांची ओळख ! आपला परम मित्र लायल याला लिहिलेल्या पत्रात ते लिहितात, " माझे नशीब अनपेक्षितपणे उघडले. " एमा वेजवुडनी दिलेल्या होकाराचे त्यांना कोण कौतुक झाले होते. आपल्या प्रेयसीला लिहिलेल्या पत्रात त्यांनी म्हटले, " माझ्यासारखा सुदैवी दुसरा कोणीच नाही. तुझ्यासारखी चांगली स्त्री उभ्या दुनियेत शोधून सापडणार नाही...एका स्त्रीने म्हटले आहे ' सारे पुरुप म्हणजे पशु '. मी पशु तर आहेच, शिवाय मी एकलकोंडा पशु आहे.....आपल्यापुढे खूपच प्रश्न आहेत. सर्वात मोठा म्हणजे आपण शहरात रहावयाचे की खेड्यात ?....मेर येथील मेजवान्या–समारंभांनी भरगच्च भरलेल्या गजबजाटाच्या जीवनानंतर लग्न झाल्यावर खेड्यातील एखाद्या घरी शांतपणे राहणे तुला कंटाळवाणे वाटेल नाही ?...हे माझे लिहिणे कुणाला दाखवू नकोस हं ! म्हणजे माझ्या डोक्यात जे काही येईल ते निर्धास्तपणे खरडण्यास मला भीती वाटायची नाही. हे लिहिणे किती का मूर्खपणाचे असेना, त्याची मला पर्वा नाही—अत्यंत आवडणारी गोष्ट मिळाल्यावर एखाद्या लहान मुलाची होते तशी माझी स्थिती झाली आहे— "

भावी पत्नीला लिहिलेल्या दुसऱ्या एका पत्रात डार्विन लिहितात, " मी फार आत्मनिष्ठ आहे ... मला तू माणसात आण. माझ्या वाईट अक्षराची चेष्टा करतेस काय ? "

एमा वेजवुड यांनी आपल्या आत्याला लिहिले, " चार्लसच्या मनात काय चालले आहे, हे त्याच्या मुद्रेवर इतके स्वच्छ दिसते ! माझ्यातरी

पाहण्यात असा मनुष्य नाही .... शोधायलाच गेले तर त्याच्यात एकच दोष आढळतो. त्याला नाटकांची गोडी नाही. "

१८३९ साली डार्विन यांचा एमा वेजवुड यांच्याशी विवाह झाला. वेजवुड घराणे सुविद्य होते. त्याकाळच्या मुलींना जे शिक्षण मिळे त्या मानाने एमा वेजवुड या चांगल्याच सुसंस्कृत समजल्या पाहिजेत.

लग्नानंतर डार्विननी लंडनमध्ये बिऱ्हाड थाटले. याच काळात त्यानी '**जीवजातींची उत्पत्ति**' या महान ग्रंथाची पहिली टिपणे करावयास सुरुवात केली. शास्त्रज्ञ, लेखक इतिहासकार, तत्त्वज्ञ यांच्या गाठीभेटी, गप्पा यांनी सर्व दिवस कसे भरगच्च भरलेले असावयाचे. त्यांतच शास्त्रीय विषयांचे लेखन. प्रसिद्ध इतिहासकार मेकॉले व तत्त्वज्ञ कार्लाइल यांच्याशी डार्विन यांची ओळख याच काळात झाली.

आतापर्यंत एकलकोंडे, शास्त्रज्ञाचे जीवन जगणाऱ्या डार्विनना लंडनमधील हे मेजवान्या–भाषणांचे गलबलाटाचे जीवन सोसेना. त्यांची प्रकृति आधीच नाजूक, त्यात ही धावपळ आणि जाग्रणे. त्यांना भीती वाटू लागली, हे जर असेच चालू राहिले तर आपल्या हातून मोठी कामे कशी काय पार पडणार? पत्नीनेही हेच मत दिले. वास्तविक एमा वेजवुड यांच्या आवडीनिवडीशी लंडनमधील हे जीवन मिळते-जुळते होते. तरीदेखील त्यांनी आपल्या पतीच्या हिताच्या दृष्टीने यावेळी दिलेला सल्ला खरोखरीच फार मोलाचा ठरला.

डार्विनना आपल्या पत्नीबद्दल प्रेम तर वाटेच पण त्याहीपेक्षा बलवत्तर भावना असे कृतज्ञतेची. आणि ते बरोबरच होते !

विवाह झाल्यावर लंडनमध्ये त्यांचे तीन वर्षे वास्तव्य झाले. त्यांना स्वतःला शहरी जीवनाची ओढ नव्हती. आपली पत्नी एमा हिला खेडेगावात राहणे आवडणार नाही हा विचार आपला आपणच करून त्यांनी लंडनमध्ये राहण्याचे ठरविले होते. लहानपणापासून रानावनात हिंडून पशु-पक्षी-वनस्पतींशी मैत्रीचे नाते जोडणाऱ्या डार्विनना शहरी

जीवन मानवेना. नाटके, मेजवान्या, भेटीगाठी यांची दगदग त्यांच्या प्रकृतीस झेपेना.

हृदयाची धडधड चालू होई, शरीर थरथर कापे. बीगलच्या सफरीच्या आधीच हा हृदयविकार चालू झाला होता. डॉक्टरला दाखविल्यास सफरीत उगीचच मोडता येईल या भीतीने त्यांनी तो दाबून ठेवला होता. त्याने आता जोर करावयास सुरुवात केली. पण या सर्वांपेक्षा त्यांना जाचणारी गोष्ट म्हणजे येथे संशोधनाच्या कामाला वेळ कमी मिळे ही !

मेजवान्या, नृत्य-गायनाचे कार्यक्रम त्यांना आवडत; पण मानवत नसत. अशा प्रसंगी आपल्या साऱ्या मनोवृत्ती इतक्या उत्तेजित होतात की त्यामुळेच आपली प्रकृति बिघडते असे त्यांना वाटे. आपल्या-सारख्याला खेडेच बरे हा त्यांचा निश्चय कायम झाला. आणि त्या दृष्टीने हालचाल सुरू झाली.

सरे परगण्यात व इतरत्र त्यांनी शोधशोध शोधले पण मनासारखे घर काही मिळेना. एकाद्या घरासभोवती पुष्कळशी मोकळी जागा असली तर ते घर फारच लहान असावयाचे. मनासारखे मोठे घर सापडलेच तर अशी मोकळी जागा नसावयाची. शेवटी डाउन येथे मनासारखे एक घर मिळाले. सभोवती नीरव शांतता, विविध जातींच्या वनस्पती, आणि खरोखरीचे खेड्याचे वातावरण. या "डाउनच्या तपस्व्याला" हवी तशी योग्य आश्रमभूमी होती ही !

या घरात चाळीस वर्षे त्यांचे वास्तव्य झाले. त्यांना जगद्विख्यात शास्त्रज्ञाची कीर्ती येथेच लाभली. कौटुंबिक सुखाचे आणि दुःखाचे सारे क्षण त्यांनी येथेच भोगले.

म. ग्रं. सं. ठाणे नगर वाचन शाखा.
वा. क्र. ११३८१ नों
वि. ... क्र. ...

# लेखनकार्य

येथे आल्यावर सुरवातीसुरवातीला भेटीगाठी, मेजवान्या, उठबस अशा गोष्टी चालूच राहिल्या, पण जरा कमी प्रमाणावर ! या कार्यक्रमांनी त्यांची प्रकृति जास्तच बिघडू लागली. आणि मग सुरू झाले " शालीचे चरित्र." त्यांच्या एका चरित्रकाराने त्यांच्या चरित्राला नाव दिले " शालीचे चरित्र ! " म्हणजे असे, डाऊन येथे लेखनवाचनाच्या वेळी डार्विन एक शाल पांघरून घेत. त्यांच्या साऱ्याच कार्याला या शालीचे साहचर्य अथपासून इतिपर्यंत लाभले. म्हणून चरित्रकाराने डार्विन यांचे चरित्र म्हणजेच त्यांच्या शालीचे चरित्र असे समीकरण गृहीत धरले. या शालीने डार्विनना एक दोन नव्हे, सतत चाळीस वर्षे साथ दिली.

डार्विन आपल्या या जीवनक्रमावर खूष होते. आत्मचरित्रात ते म्हणतात, " आमच्या इतके सुदीर्घ आणि शांत जीवन फारच थोड्यांच्या वाट्याला आले असेल ! "

या घरातील सारीच कामे ते वेळापत्रकाप्रमाणे आखीत असत. डार्विन यांची उठण्याची वेळ, कामाची वेळ, वाचण्याची वेळ, वामकुक्षी, झोप, फार काय मुलांबरोबर खेळण्याची वेळ देखील निश्चित ठरलेली असे. त्यात कधी म्हणून बदल व्हावयाचा नाही. नाही म्हणावयाला मुलांनीच त्यांना खेळात ओढण्याचा हट्ट धरला तर हातातील महत्त्वाचे शास्त्रीय लेखनदेखील बाजूला ठेवून ते मुलांमध्ये सामील होत आणि मग त्यांची चुणचुणीत मुले आपल्या बाबांना हातापायांवर रांगायला

लावीत, त्यांच्या पाठीवर आळीपाळीने स्वार होत आणि जगातील हे थोर शास्त्रज्ञ ' घोडाघोडा ' करीत हॉलभर फिरत !

रात्रीचे साडेदहा वाजले की ते अंथरुणात आडवे होत. झोप येईलच अशी खात्री नसे. बहुधा स्वस्थ झोप यायचीच नाही. पहाटे लवकर जाग येई. आळशासारखे अंथरुणात लोळत पडणे त्याना कधीच आवडत नसे. मग ते उठत, आपला सैल काळा सूट चढवीत, हातात काठी घेऊन, मोठ्या खणखणीत आवाजात ते कुत्रीला हाक मारीत " पॉली ! "

त्यांची प्रकृति फारच तोळामासा. पण त्याचा परिणाम तीन गोष्टींवर अजीबात झाला नाही. त्यांची मुद्रा आरक्त, त्यामुळे पाहणाराला वाटे " काय पण प्रकृति आहे डार्विनसाहेबांची ! अगदी ठणठणीत ! " डार्विन यांचा खणखणीत आवाज देखील प्रथमपासून शेवटपर्यंत तसाच राहिला. त्यावर त्यांच्या वाढत्या वयाचा किंवा वाईट प्रकृतीचा परिणाम झाला नाही. त्यांचा आवाज ऐकून एखाद्याला वाटावे की हे गृहस्थ चांगले धष्टपुष्ट असले पाहिजेत. वृद्धापकाळी त्यांच्या कपाळावर सुरकुत्या आल्या पण चेहऱ्यावर मात्र नाही. काम करण्याची उमेद तर कायमच राहिली.

पॉली —त्यांची आवडती कुत्री गुर्रर करीत जणू म्हणे, " चला लवकर. "

काठी ठोकीत ठोकीत, हात हलवीत, लयीत पावले टाकीत, डार्विन फिरायला निघावयाचे. चालताना मधूनच बोटे झटकावयाचे.

ते झाडापाशी थांबत. फुलांकडे पाहून बोलू लागत, " अरे, अजून हिवाळा चालू आहे, कशाला घाई केलीस इतकी इकडे येण्याची ? " फुलांशी बोलणे, अगदी त्यांना लहान मुले समजून त्यांच्याशी प्रेमाने गोष्टी करणे, हा त्यांचा स्वभावच.

बाहेर फेरफटका करून आल्यावर सकाळची न्याहारी !

आणि सकाळी आठ वाजता ते आपल्या कामाला लागत. आठ ते साडेनऊ ही त्यांची कामाची आवडती वेळ.

त्यांच्या लिहिण्याच्या खोलीत एक उंचचउंच पायांची खास तयार करवून घेतलेली खुर्ची असे. तिच्यावर भव्य शरीरयष्टीचे डार्विनसाहेब खांद्यावर आपली आवडती शाल टाकून बसत. आणि मग त्यांचे लेखन सुरू होई.

ते काही हाडाचे लेखक नव्हते. लिहिताना आपले म्हणणे स्पष्टपणे मांडले जावे म्हणून त्यांना खूपच विचारपूर्वक लिहावे लागे. प्रथम जसे सुचेल तसे ते भराभर लिहित जात. मग त्यावर फिरून विचार करून हे लिखाण सुधारले जाई. कधीकधी स्वतःच लिहिलेले वाचण्याची पंचाईत पडे! लग्नापूर्वी प्रेयसीला लिहिलेल्या पत्रातील अक्षर असेच वाईट होते. ते शेवटपर्यंत तसेच राहिले.

लेखणी खाली ठेवून उजव्या हाताने आपले डावे मनगट धरून ठेवले आहे, लेखनाची गाडी अडली आहे, अशा वेळी ते कोट उतरून ठेवत. खांद्यावर शाल टाकून झपाझप हॉलमध्ये जात. तेथे एका टेबलावर ठेवलेल्या बरणीतून चिमूटभर तपकीर घेऊन ती ओढीतच अभ्यासिकेत येत. ही बरणी लिहिण्याच्या खुर्चीपाशी कधीच नसे. तपकीर वारंवार ओढाविशी वाटेल ना! त्यामुळे कामात खोळंबा आणि प्रकृतीला त्रास!

साडेनऊ वाजले की पत्रव्यवहार! कधी पत्रे थोडी असत, कधी पुष्कळ. थोडी असली की त्याना आनंद होई. ते म्हणत, “आज माझ्यावर कृपा आहे लोकांची!” असे असले तरी आलेल्या पत्राला उत्तर हे गेलेच पाहिजे, हा नियम ते काटेकोरपणे पाळत. त्यात कागदाची किंवा वेळेची काटकसर आड येत नसे!

त्रासदायक, रिकामटेकड्या पत्रलेखकांसाठी त्यांनी एक कायमचे पत्र तयार करून त्याच्या प्रती छापवून घेतल्या होत्या. पण इतक्या वर्षांत

त्यांपैकी एकही प्रत कोणाला पाठविण्यांत आली असेल तर शपथ. पत्रलेखक कसा का असेना, संकोचानें डार्विन त्याला रीतसर, व्यवस्थित उत्तर पाठवीत.

साडेदहा वाजले. आता कादंबरी वाचनाची वेळ. म्हणजे ते स्वतः वाचीत नसतच, कोणाकडून तरी वाचवून घेत. शोकांत कादंबरी त्यांना आवडत नसे.

हे सारे बारा सवाबारापर्यंत चाले. मग डार्विन म्हणत, "चला, आपले काम आपण बजावले!"

सायंकाळी साडेचार ते साडेपाच हा लेखनाचा वेळ! बाकीचा वेळ कुठे बागेत फेरफटका कर, दिल्याघेतल्या पैशांचे टिपण कर, अशा विविध उद्योगात जावयाचा. पैशाचा हिशेब चोख ठेवण्याचा आणखी एक नाद त्यांना होता. वर्षाच्या शेवटी ठरल्यापेक्षा जास्त राहिलेली शिल्लक ते मुलांमध्ये वाटून टाकीत. पण पैन् पैचा हिशेब हा लागलाच पाहिजे.

दिवसाकाठी काही वेळ जर्मन शिकण्यात जाई. त्यांची शिकण्याची पद्धत अभ्यासू वृत्तीची होती. नवीन शब्द आला रे आला की उघडलाच त्यांनी शब्दकोष! हळू हळू वाचलेले समजण्यापुरते जर्मन त्यांना येऊ लागले. एके दिवशी, सर जे. हूकर समोरच बसलेले होते. त्यांना डार्विन म्हणाले, "जर्मन शिकायला मी ही अशी सुरुवात केली." सरसाहेब म्हणाले, "एकदाच ना? ऊं; हे काहीच नाही. मी तर अशी सुरुवात अनेकदा केली आहे!"

मध्यान्ह वेळी पाय मोकळा करण्यासाठी ते बागेत फिरत. पक्ष्यांची अंडी जमविण्याचा त्यांचा छंद अजून कायम आहे. त्यांची मुले देखील अंडी जमवीत. पण त्यांपैकी कोणाहीपेक्षा डार्विनना अंडी लवकर आणि जास्त सापडत. सोंगट्या खेळताना नशीब त्यांच्या बाजूला

नसे; पण या बाबतीत मात्र असे. पक्षी घरटी कशी बांधतात हें पहाण्यात त्यांचे तासन्तास निघून जात.

आता ते असेच उभे आहेत, निश्चल! अगदी पुतळ्यासारखे! त्यांच्या अंगावर खारीचे पिले भराभरा चढली तरी त्याचे त्यांना भान नाही. त्या पिलांच्या आईने घाबरून जाऊन कलकलाट केला तरी डार्विन आपले उभे ते उभेच!

सायंकाळी फिरून एकदां दुपारच्या सारखेच कादंबरीवाचन! शास्त्रीय विषयांवरील पुस्तके व वर्तमानपत्रे हीच काय ती डार्विन स्वतः वाचीत.

रात्री झोंपण्यापूर्वी डार्विन पत्नीबरोबर सोंगट्यांचे दोन डाव टाकीत. हार-जीत चालूच असे. पण जिंकल्याचा आनंद व हरल्याचे दुःख ते दररोज नव्याने भोगीत. " आज फासा तुझ्या बाजूने पडतो आहे गुलाम! " लटक्या रागाने ते म्हणत. " मी इतका खेळतो आहे तरी देखील तूच जिंकलेस. माझे नशीबच फिरले आहे आज! "


नंतर शास्त्रीय ग्रंथांचे वाचन! त्यानंतर एमा वेजवुड पियानो वाजवीत. इतर कोणतेही काम डार्विन जसे लक्षपूर्वक करीत तसेच हे ऐकणे देखील. पियानोवर शोकगीत वाजत असले तर त्यांच्या डोळ्यात अश्रू तरारत. त्यांना गुणगुणण्याचा नाद होता. पण हे गुणगुणण्याचे गाणे एकच एक होते, चाळीस पन्नास वर्षे! एकच एक गोष्टीचा ध्यास घेणाऱ्या शास्त्रज्ञाला हे शोभेसेच होते...

दिवसाकाठी मुलांशी खेळण्यात त्यांचा काही वेळ जाई. शिवाय पॉलीबरोबरही खेळावे लागे. नाहीतर ती ऐकतच नसे. पॉलीच्या नाकावर बिस्किट ठेवून ते सांगत, " आता वेडपटपणा करशील आणि पाडशील खाली बिस्किट! नीट, जपून पकड पाहू! "

मुलें टेनिस खेळत असली की बाजूला उभे राहून डार्विन पहात असत. एखादा चेंडू त्यांच्या बाजूला उडालाच तर त्यांच्यामधील तरुणपणीचा नेमबाज जागा होई. आपल्या काठीच्या वाकड्या टोकाने ते चेंडू असा काही टोलवीत की मुले टाळ्या पिटू लागत.

मध्येच एखादे वेळी लंडनला जाण्याचे निघे. सामानाची बांधाबांध चालू झाली की पॉलीला कळून चुके की आपले धनी आज बाहेर जात आहेत. तिला ते अजीबात खपत नसे. त्यांच्या अंगावर ती झेप घालायची आणि जणू सांगायची 'काही नाही जायचे बाहेर!' तिच्या डोक्यावर थोपटीत डार्विन तिला समजावून सांगावयाचे, 'मी लवकरच परतेन हं!'

डार्विन परत यावयाच्या आदल्या दिवशीच त्यांच्या खोलीची झाडझूड चालू होई. पॉली खूष होई. धनी आल्याबरोबर कू कू करीत त्यांच्या अंगावर ती उड्या घेई. आणि मगच शांत होई.



* ११ *

# " जीवजातींची उत्पत्ति "

डार्विन यांच्या मनाला एक टोचणी असे. आपण लिहावयाला घेतलेल्या ग्रंथांतील महत्त्वाचा शोध आपल्या आधीच कोणी मांडील की काय?

ईश्वराने म्हटले, " आता प्रकाश होवो आणि प्रकाश पडला " (God said "Let there be light, and there was light") या बायबलमधील वाक्याप्रमाणे काही सृष्टीची उत्पत्ति झाली नाही. सृष्टीत प्राण्यांच्या व वनस्पतींच्या ज्या लक्षावधी जाती आढळतात त्यांच्या उत्पत्तीमध्ये एक सूत्र गोवलेले आहे; या सत्याचा साक्षात्कार डार्विनना बीगलवरील सफरीत झाला. यावेळी त्यांनी जे जे म्हणून पाहिले, जे जे म्हणून निष्कर्ष काढले, त्याची त्यांनी व्यवस्थित टिपणे करून ठेवली होती. या टिपणांचे संकलन करण्याचे काम त्यांनी १८३७ साली सुरू केले. कित्येक ग्रंथ वाचले, कित्येक शास्त्रज्ञांच्या मुलाखती घेतल्या, कित्येकांना पत्रे लिहून विचारणा केली, शास्त्रीय मासिकांतील लेख वाचले. १८३८ साली माल्थुसचा " लोकसंख्या " हा प्रसिद्ध ग्रंथ त्यांच्या वाचनात आला. भूमितीश्रेढीने होणाऱ्या प्राण्यांच्या वाढीचे तत्त्व वाचण्यात आल्याबरोबर त्यांच्या मनात एका उपपत्तीचा आराखडा तयार झाला. सृष्टीत प्रजीवांची उत्पत्ती भयंकर प्रमाणावर होत असते, जगण्यासाठी त्यांना धडपड करावी लागते. त्यांच्या शरीरात सतत बदल घडत असतात. त्यात ज्यांमध्ये टिकून राहण्याला योग्य असे बदल होतात ते प्राणी राहतात, बाकीचे नाहीसे

होतात, आणि त्यातूनच जीवसृष्टीचा विकास होत जातो, नव्या नव्या जाती निर्माण होत जातात, उत्क्रांति होते, हे सूत्र त्यांना स्फुरले. त्यांनी हा विचार पस्तीस पानांत लिहून काढला. १८४४ साली त्याचाच २४० पानांचा ग्रंथ लिहून झाला.

आणि १८५६ साली त्यांची मनःशांति ढळली. वॉलेस नावाच्या शास्त्रज्ञाने त्यांच्याकडे आपला एक निबंध पाठविला. त्याने डार्विनना लिहिले, " तुम्हाला योग्य वाटल्यास हा निबंध तुम्ही मि. लायल यांच्याकडे पाठवा. " आश्चर्य असे की जे विचार डार्विननी आपल्या तयार होत असलेल्या ग्रंथात मांडले होते तेच या निबंधात होते ! आणि ज्या मालथुसच्या ग्रंथाने डार्विनना आपला सिद्धांत सुचला त्याच ग्रंथाच्या वाचनाने तो वॉलेस यांनाही सुचला होता !

संशोधनाच्या बाबतीत हे असे कितीतरी वेळा घडले आहे. कागद, छापण्याची कला, इत्यादींचे शोध अनेक देशात जवळजवळ एकाच वेळी लागले. सतत बदलत असलेल्या समाजात निरनिराळ्या,काळी निरनिराळ्या गोष्टींची गरज निर्माण होते. ती पुरी करण्याची खटपट अनेकजण करीत असतात. कधीकधी त्यात एकेकालाच यश येतें तर कधीकधी अनेकांच्या संशोधनाचें कार्य सहकार्याने देखील झालेलें आढळून येते.

वॉलेस यानी स्वतंत्रपणे केलेल्या ह्या संशोधनाचे महत्त्व डार्विनना मान्य होतेच. त्याचबरोबर स्वतःच्या परिश्रमाच्या फळाला कःपदार्थ मानायला देखील त्याना जड जात होते. मोठ्याच पेचप्रसंगात ते सापडले. त्यांना अवघडल्यासारखे झाले. त्यानी तर मनाने ठरवून टाकले की उत्क्रांतीच्या सिद्धांताचे जनकत्व सरळ वॉलेस यांच्याकडे जाऊ द्यावयाचें. परंतु डार्विन यांचे शास्त्रज्ञ मित्र लायल व हूकर यांनी त्यांना सल्ला दिला की " तुम्ही तुमच्या संशोधनाचा सारांश व मि. वॉलेस यांचा निबंध बरोबरच प्रसिद्ध करा. " हे देखील डार्विनना पटवायला जडच गेले. त्यांच्या मनात आले की वॉलेसना काय वाटेल ? वॉलेस यांच्या उदार

मनाची त्याना कल्पना नव्हती. शेवटी मित्रांच्या सल्ल्याप्रमाणे त्यांनी हे दोन्ही निबंध एकदमच प्रसिद्ध केले.

खरा शास्त्रज्ञ विचाराने व आचाराने संत असतो याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

**१८५९ साली “जीवजातींची उत्पत्ति” हा डार्विन यांचा ग्रंथ प्रसिद्ध झाला.**

वॉलेस व डार्विन यांनी एकदमच प्रसिद्ध केलेल्या संशोधनाचे श्रेय सामान्य लोकांच्या जगात दोघांमध्ये विभागले गेले नाही. याचे कारण उघड आहे. आपला सिद्धांत जगापुढे ठेवताना कित्येक वर्षे गोळा केलेला भरभक्कम पुरावा डार्विननी आपल्या ग्रंथात मांडला.

त्यानी मांडलेला हा विचार बरोबर की चूक याची शास्त्रीय छाननी करण्याआधीच या अवाढव्य पुराव्याने वाचकाची छाती दडपून जाई. विरोधाला जणू जागाच उरत नसे. शिवाय आपल्या विचाराला पोषक व बाधक अशा साऱ्याच मुद्यांची व्यवस्थित नोंद ठेवून डार्विननी त्यांचा परामर्ष आपल्या ग्रंथात घेतलेला असल्यामुळे विरोध असा झालाच नाही.

स्वतःच्या ग्रंथाविषयी त्यांनी म्हटले आहे :

‘ या ग्रंथासाठी मी जास्तीतजास्त श्रम केले आहेत. आणि यापेक्षा अधिक कोणाला करता येणार नाहीत. ’ आपल्या ग्रंथाविषयी त्यानी काढलेले हे उद्गार सर्वस्वी खरे आहेत.


या विद्वन्मान्य ग्रंथाने सनातनी लोकांच्या मात्र तळपायाची आग मस्तकाला पोचली. कारण त्यामुळे ईश्वरासंबंधीच्या भोळसट कल्पनांना जबरदस्त तडाखा बसला. त्यांना वाटले, प्राण्यांच्या उत्पत्तीत जर ईश्वराला काहीच करायला लागले नसेल तर मग ईश्वराला कार्य ते काय राहिले ? आणि त्याचे कर्तृत्व ते काय ? त्यांनी डार्विन यांच्यावर टीकेची झोड उडविली, व्यंगचित्रे काढली, कुचेष्टा करणारी चोपडी लिहिली !

★



प्राणि-जीवनाची उत्क्रांति !

( पान ६६ पहा )



प्राण्यांच्या हाडांच्या रचनेतील साम्य

( पान ६७ पहा )

* १२ *

# " निसर्गाची निवड "

डार्विननी केलेल्या महान संशोधनाने एका नवीन युगाची सुरुवात केली. हे संशोधन कशाविषयी आहे ? त्याने मानवाच्या विचाराला कोणते नवीन वळण लावले ?

सृष्टी कशी उत्पन्न झाली याचा विचार निरनिराळ्या धर्मांनी केला तो अगदीच अंधदृष्टीने ! पाऊस का पडतो ? देव पाडतो म्हणून. ही सृष्टी कोणी निर्माण केली ? देवाने. त्याने सृष्टी का निर्माण केली ? त्याला वाटलें म्हणून. कशी निर्मिली ? तो सर्वशक्तिमान् व सर्वज्ञ आहे, त्याने तशी इच्छा केली म्हणून सृष्टी निर्माण झाली. कधी निर्माण झाली ? बायबल प्रमाण मानायचे तर केवळ चार पाच हजार वर्षांपूर्वी. एके दिवशी ईश्वर कामाला लागला आणि सहा दिवसात त्याने सृष्टि निर्माण केली; सूर्य, तारे, दगडमाती, ग्रह, गोल, निर्जीव आणि सजीव, सर्व काही **एकाच वेळी** निर्माण झाले आणि हे सर्व त्यात काहीही बदल न होता शाश्वत टिकून रहाणार आहे. सर्व प्राणी एकाच दिवशी जन्मले आणि एकाच दिवशी मरणार !

सृष्टीचा कर्ता ईश्वर आहे म्हटल्यावर आणि श्रद्धेने त्यावर विश्वास ठेवल्यावर सृष्टीच्या उत्पत्तीचा विचार तो काय करावयाचा राहिला ? जगातील जवळजवळ एकूण एक मनुष्य या ना त्या धर्माचा अनुयायी असल्यामुळे अंधश्रद्धेचे साम्राज्य या जगात कित्येक शतके टिकून राहिले. या अंधश्रद्धेनेच राजांची सिंहासने, धर्मगुरुंचा अधिकार, धनिकांची मालकी या सर्वांना आधार दिला. मानवाच्या डोळ्यांवर अंधश्रद्धेचे झापड धर्माने करकचून आवळले होते.

असे होते तरी देखील जीवजातींच्या उत्पत्तीसंबंधी शास्त्रीय विचाराशी जुळतामिळता असा विचार खिस्तपूर्व कित्येक शतके चिन्यांनी मांडला, ग्रीक तत्त्वज्ञ एपिक्यूरसने मांडला, रोमन तत्त्वज्ञ लेक्रेशिअसने मांडला. या दिशेने आधुनिक काळातील शास्त्रज्ञांमध्ये फ्रेंच उत्क्रांतिवादी **बॅप्टिस लामार्क** ( १७४४–१८२९ ) हा पहिला होय. त्याच्या सिद्धांताचे सार म्हणून असे सांगता येईल :

प्राण्यांच्या अवयवांचे आकारमान, त्यांची शक्ती ही बदलत असतात. निरनिराळ्या काळच्या बदलत्या गरजेनुसार हे होते. सततच्या उपयोगाने अवयव वाढीस लागतात. अजिबात उपयोग न केल्याने ते निर्जीव होतात. आणि सारे बदल एका पिढीत दुसऱ्या पिढीत उतरतात, आनुवांशिक असतात.

पण अभ्यासाने प्राप्त करून घेतलेले विशेष बदल आनुवांशिक नसतात. लामार्कचे आनुवांशिक बदलाचे तत्त्व अनुमानावर आधारलेले होते, त्याला प्रयोगसिद्ध ज्ञानाचा किंवा शास्त्रीय पुराव्याचा आधार नव्हता. डार्विनना ही उपपत्ति मान्य नव्हती.

जिराफाची मान उंच का? याचे लामार्क यांच्या म्हणण्याप्रमाणे उत्तर असे की, सृष्टीच्या इतिहासात केव्हातरी जिराफाला जमिनीवरील गवत मिळेनासे झाले. झाडांची पाने खाऊन राहण्याची त्याच्यावर पाळी आली. फांद्यांकडे मान उंच उंच करता करता ती कायमची लांब झाली. मानेची वाढलेली लांबी आनुवांशिकतेने त्यांच्या प्रजेत उतरली. ही उपपत्ति आज मान्य नाही.

आनुवंशिकतेचा शास्त्रीय अभ्यास **मेंडेल** ( १८२२–१८८४ ) या शास्त्रज्ञाने केला. त्याने मांडलेल्या सिद्धांताला प्रयोगसिद्ध ज्ञानाचा आधार आहे. मात्र मेंडेल यांचा सिद्धांत डार्विन यांच्या वाचनात आला नव्हता. म्हणून "जीवजातींची उत्पत्ति" या ग्रंथाच्या शेवटच्या आवृत्तीत ते म्हणतात, " आनुवंशिकतेची मूलतत्त्वे अज्ञात आहेत. "

**डार्विननी मांडलेला सिद्धांत असा** : वनस्पती व प्राणी यांच्या निर्मितीत निसर्ग बेदरकारपणे उधपळट्टी करतो. सर्वांत मंदगतीने संख्या वाढवणारा प्राणी म्हणजे हत्ती. त्याची जननक्षमतेची वर्षे साठ. ( हत्तीचे आयुष्य १०० वर्षे असते. ) एक हत्तीण आपल्या हयातीत सहा पिलांना जन्म देते. या प्रमाणाने ७५० वर्षांत हत्तीच्या एका जोडीपासून किती हत्ती निर्माण होतील ? १९,०००,००० !

कित्येक प्राण्यांची संख्या याच्या कितीतरी पटीने वाढते. जन्माला येणारा प्रत्येक प्राणी जर त्याला असलेले आयुष्य पूर्णपणे जगू लागला, तर जगांत काय अनवस्था निर्माण होईल ! अशी गर्दी होऊ नये, प्राण्यांची संख्या मर्यादित रहावी, म्हणून निसर्ग काळजी घेतो. उष्णता, थंडी, अतिवृष्टी, दुष्काळ, रोग इत्यादींच्या भक्षस्थानी प्राणी पडत असतात. शिवाय भक्ष्य-भक्षकांच्या लढाईत कित्येक नाहीसे होतात. खाणारी तोंडे वाढत्या संख्येची, त्यांचे अन्न मात्र त्या प्रमाणात वाढणारे नाही. यामुळे प्रत्येक प्राण्याला जगण्यासाठी धडपडावे लागते. सृष्टीत जीवनार्थ कलह आहे.

आवाढव्य शरीरांचे प्राणी पूर्वी पृथ्वीवर होते, ते नामशेष झाले. आजही वाघसिंहाना विशेष संरक्षण द्यावे लागते, नाहीतर ते देखील असेच नाहीसे होतील. असे का ? डार्विननी त्याचे उत्तर दिले ते असे :

सृष्टीतील कोणताही प्राणी दुसऱ्यासारखा नसतो. एकाला लपवावा व दुसऱ्याला काढावा इतके साम्य असणारी जुळी मुले खरोखरी पूर्णपणे सारखी नसतात. एकाच जातीतील प्राण्यांत हे बदल दर पिढीला होत असतात. यांपैकी काही बदल बदलत्या परिस्थितीत टिकून राहण्याला पोषक असतात तर काही मारक असतात. यामुळेच जीवनार्थ कलहात काही प्राणी टिकून राहिलेले दिसतात तर काही नामशेष होतात. यालाच डार्विननी नाव दिले " **निसर्गाची निवड** " यापेक्षा जास्त अन्वर्थक नाव स्पेन्सर या तत्त्वज्ञाने दिले आहे. ते म्हणजे Survival of the fittest— लायक तेवढेच टिकून राहतात; नालायकाच्या कपाळी नाश !

या साऱ्याच्या मुळाशी असलेले तत्त्व "प्राण्यांमध्ये बदल घडत असतात" हे आहे. ते का घडतात याचे समर्पक उत्तर मात्र त्यांना सापडले नाही.

'**जीवजातींची उत्पत्ति**' या ग्रंथात डार्विन यानी जो सिद्धान्त मांडला त्याच्याच आधारे मानव कसा निर्माण झाला असावा, यासंबंधीचा विचार त्यानी एका स्वतंत्र ग्रंथांत मांडला. त्याचे नाव— Descent of Man ! '**मानवाचा अवतार**'

मानवाचा पूर्वज कोण ? तर माकड. ही गोष्ट आज सुपरिचित आहे. संस्कृतमधील नर व वानर हे शब्द देखीच हेच सुचवितात. पण ते अंशतः खरे आहे. डार्विन यांनी म्हटल्याप्रमाणे माणूस व माकड यांचा पूर्वज एकच होता इतकेच. आजदेखील हे प्रमाण मानले जाते.

परिस्थितीने प्राण्यांमध्ये काही विशेष बदल होतात, हे दाखवून देण्यासाठी त्यांनी आपल्या व इतरांच्या निरीक्षणाने सांपडलेली कित्येक उदाहरणे दिली. चांगले हवापाणी, युक्त आहार, स्वास्थ्य यांनी उंचीत वाढ होते. सततच्या उपयोगाने आवश्यक बदल कायमचे होतात. पावलांच्या तळव्यांची कातडी इतर अवयवांवरील त्वचेच्या मानाने मूलतःच जाड असते. उंच प्रदेशात राहणाऱ्या लोकांची छाती व फुफ्फुसे मोठी असतात. मेंढी हा प्राणी मूळचा उंच पर्वत प्रदेशातील. अजून देखील मेंढरू टेकडावर चढले की त्याला बागडावेसे वाटते. मानवाचा पूर्वज आपल्याइतका हातांचा वापर करीत नसे. बुद्धीने मंद असलेला वेडसर माणूस खाताना हातांऐवजी गुरांसारखे तोंड पुढे करतो. खालच्या व वरच्या सपाट दातांच्या दोन्ही बाजूंना असलेले सुळे पूर्वीच्या कोणत्यातरी युगात भक्ष्य फाडण्यासाठी उपयोगात येत असले पाहिजेत. माणूस रागावला म्हणजे अजून देखील तो हिंस्र प्राण्यांप्रमाणेच दात विचकतो. माकडाच्या व माणसाच्या स्नायूंची रचना पुष्कळदा सारखीच आढळते. माकडाचे पुढील पाय (हात म्हणावेत हवे तर) व माणसाचे हात यांची हालचाल सारखी असते.

वस्तु पकडताना दोघांच्याही हातांचा आंगठा एका दिशेने मिटतो व आंगठ्याच्या विरुद्ध दिशेने बोटे मिटतात. मूलतः माणूस केसाळ होता. उष्णकटिबंधात रहावयास आल्यावर उवा, पिसवा यांचा त्याला त्रास होऊ लागला. शरीराला उब देण्यासाठी देखील त्यांची जरूरी उरली नाही. आणि हळुहळु त्याचे केस कमी कमी होत गेले. घर्षण, इजा इत्यादींनी मूळचे शेपूट नाहीसे झाले. शिवाय उभे चालताना त्याची अडचण होतीच. माणसाच्या व माकडाच्या बाहूंवरील केसांबाबत असेच साम्य आढळते. खांद्यापासून कोपरापर्यंत केस खालच्या बाजूला वळलेले असतात. मात्र कोपरापासून मनगटापर्यंत त्यांची दिशा उलटी असते. त्याचे कारण असे. पाऊस पडत असताना माकड आपले हात डोक्यावर धरते. पावसाचे पाणी केसांवरून निथळते. या सर्वांवरून डार्विननी काढलेला निष्कर्ष आजही मान्य आहे. तो म्हणजे माणसाचा व माकडाचा पूर्वज एकच होता.

त्यांच्या "जीवजातींची उत्पत्ती" या पहिल्या ग्रंथाप्रमाणेच याही ग्रंथाने खूपच खळबळ उडवून दिली. मानव हा देखील एकूण जीवसृष्टीचा एक घटक आहे, प्राणिसृष्टीच्या विकासातून त्याचा जन्म झाला; इतर वस्तुजाताप्रमाणे त्याचाही विकास होईल व अंतही होईल, या विचाराला भरभक्कम शास्त्रीय आधार त्यांनी मिळवून दिला.

डोक्यावर अज्ञानाचे ओझे घेऊन, सत्याकडे पाठ फिरवूनच सत्याशी पोचण्याची धडपड करणाऱ्या मानवजातीला योग्य मार्ग दाखविणाऱ्या थोर मार्गदर्शकांमध्ये डार्विन यांची गणना केली पाहिजे! डार्विनना डाऊन येथील संत म्हणतात ते याही अर्थाने खरे आहे.

पृथ्वीची जन्मकथा भूगोलाच्या पुस्तकात तुम्ही वाचली असेलच. पृथ्वीवर प्राणीसृष्टी कशी निर्माण झाली? अर्थात उत्क्रांतीच्या तत्त्वानुसार. डार्विन यांच्या संशोधनाने निघालेल्या तत्त्वाला आधार कोणता?

उत्क्रांतीचा इतिहास पाच महायुगांमध्ये विभागला जातो. एक महायुग अमूक एकाक्षणी संपले व लागलीच दुसरे सुरू झालें असे मात्र मुळीच नव्हे. अभ्यासाच्या सोयीसाठी हे टप्पे कल्पिलेले आहेत, इतकेच. नाही तर उत्क्रांतीचा प्रवाह अखंडपणेच वहात आला आहे.

सुरवातीला आपल्या पृथ्वीवर शेवाळाखेरीज दुसरी वनस्पती नव्हती. त्यानंतर ना फूल, ना फळ, ना बी अशी गवतासारखी वनस्पती आली. लिबलिबित शरीराचे एक-पेशी प्राणी होते. हेच पृथ्वीवरील पहिले जीव.

यानंतर दुसऱ्या महायुगात जलचरांची संख्या पुष्कळ वाढली. त्यातूनच मासे व बेडूक आले. केवळ पाण्यात राहणारे प्राणी जीवनाच्या झगड्यात मागे पडू लागले. जमिनीवर व पाण्यात, दोन्ही ठिकाणी संचार करू शकणारे बेडूक या काळात जगायला जास्त लायक ठरले. फर्न जातीच्या बिनफुलांच्या वनस्पती खूपच वाढल्या.

आता आले डिनोसॉर आणि इतर अजस्त्र आकाराचे प्राणी. शंभर शंभर फूट लांबीच्या या प्राण्यांना पोषक अशी परिस्थिती अगोदरच निर्माण झालेली होती. उबदार हवा व भरपूर खाद्यामुळे या प्राण्यांचे फावले.

त्यांच्या तडाक्यातून सुटण्याची आवश्यकता भासू लागली. हवेतून उड्डाण करणाऱ्या प्राण्यांनाच हे शक्य झाले. त्याच्यानंतर आले सस्तन प्राणी. अर्थातच हे अंडज नव्हते. त्यांची प्रजा अंडजापेक्षा जास्त प्रमाणात टिकून राही. सस्तनांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढू लागली. याच काळात वनस्पतींना फुले व फळे आली. फळांच्या बिया फळांमध्ये सुरक्षित राहू लागल्या.

सरतेशेवटी सस्तन प्राण्यांमध्ये वानराचा अवतार झाला. इतर प्राण्यांपेक्षा वानर कितीतरी बुद्धिमान. परिस्थितीनुरूप बदल करून टिकून राहण्यात तो चांगलाच यशस्वी ठरला. यांपैकीच एका विशिष्ट जातीच्या प्राण्यामधून आजचा मानव उत्पन्न झाला.

पूर्वी सांगितलेच आहे की कोणतेही दोन प्राणी पूर्णतः एकसारखे नसतात. दर पिढीत सारखा बदल घडत असतो. पोषक बदल असलेले प्राणी टिकून राहतात. त्यांची संख्या वाढते. बाकीचे नाहीसे होतात. याच क्रमाने सारी सृष्टी निर्माण झाली.

उत्क्रांतीच्या या तत्त्वाला आधार काय ? आधार तीन प्रकारचे आहेत :—

१) सृष्टी जसजशी घडत गेली त्या त्या काळातील वनस्पती व जीवांचे ठसे कोळशाच्या किंवा खडकांच्या थरावर उमटलेले आढळतात. कोणत्या प्रकारच्या थरात हे ठसे आढळतात त्यावरून तो प्राणी कोणत्या युगातील आहे याचे अनुमान शास्त्रज्ञ करू शकतात. पृथ्वीवरील प्राण्यांच्या जाती कोणत्या क्रमाने अस्तित्वात आल्या हे समजू शकते.

( २ ) दुसरे प्रमाण म्हणजे निरनिराळ्या प्राण्यांच्या शरीराची घडण. एकपेशी प्राण्यापासून मानवाच्या शरीरापर्यंत लक्षावधी भेद असलेले शरीरांचे सांगाडे अभ्यासून त्यावरून कालानुक्रमाने प्राणीजाती कशा अस्तित्वात आल्या याची कल्पना येते. शरीराची रचना जितकी सूक्ष्म व गुंतागुंतीची तितका तो प्राणी अर्वाचीन समजला जातो.

( ३ ) तिसरे प्रमाण असे. गर्भावस्थेत वाढत असताना सारे जीव प्रथमतः सारखेच दिसतात. ज्या अनुक्रमाने पृथ्वीवर प्राणीजाती निर्माण झाल्या तोच अनुक्रम गर्भाच्या विकासाच्या एकेक अवस्था दाखवितात. उत्क्रांतीमधील शेवटचा टप्पा म्हणजे मानव. गर्भावस्थेतील त्याची वाढ उत्क्रांतीचे सारे टप्पे स्पष्टपणे दाखविते. गर्भावस्थेतील मानवाचे हृदय प्रथमतः माशाच्या हृदयासारखे दोन कप्प्यांचे असते. मग ते बेडकाच्या हृदयासारखे तीन कप्प्यांचे होते. आणि शेवटी ते चार कप्प्यांचे बनते !

या साऱ्या प्रमाणांवरून डार्विननी संशोधिलेले तत्त्व किती भरभक्कम पायावर उभे आहे त्याची कल्पना येते.

★



तीन निरनिराळ्या प्राण्यांची गर्भावस्थेतील वाढ
तिसरा प्राणी मनुष्य आहे.

( पान ६७ पहा )

★ १३ ★

# जीवनज्योत मालवली !

समोरील खुर्चीवर टेकलेले पाय खाली घेऊन आपल्या उंच खुर्चीवरून डार्विन खाली उतरले. त्यांना तपकीर ओढावयाची आहे. काय करावे असा प्रश्न पडला की लिहिणे थांबवून ते सरळ हॉलमध्ये जातात, वरणीतील तपकिरीची चिमूट घेतात व ती ओढीत ओढीत अभ्यासिकेत परततात. खांद्यावर नेहमीप्रमाणे शाल आहेच. खुर्चीच्या हातावर एक फळी आहे. तिच्यावर कागदाचे कपटे, पाठखोरी आहेत. प्रकाशकाच्या सूचनेवरून ते आपले आत्मचरित्र लिहीत आहेत. आधी लिहावयाचे म्हणजे कठिण काम, त्यातून स्वत:संबंधी, म्हणजे चांगलेच कठिण. उगीच नाही वारंवार तपकीर ओढावयाला लागत! त्यांच्या पुढे असलेल्या कागदांवर नजर टाकू या. सहजासहजी वाचता येणार नाही मजकूर. कधी कधी त्यांचे त्यानाच वाचता येत नाही तर आपली काय कथा !

ते लिहीत आहेत :

“....माझे ग्रंथ म्हणजे आयुष्याच्या माझ्या वाटचालीवरचे मैलाचे दगड आहेत. तीस वर्षांत क्षीणतेपलीकडे दुसरा काही बदल मला जाणवत नाही.....लिहिणे मला नेहमीच कठीण जाते, या अडचणीमुळे माझा फार वेळ फुकट जातो. त्यामुळे माझा फायदा पण झाला आहे. माझ्या किंवा इतरांच्या विधानातील व युक्तिवादातील चूक मला चटकन समजते....सुरवातीला मी प्रथम वाक्य जुळवून नंतर ते लिहीत असे. मग मी ही पद्धत बदलली. जसे सुचेल तसे भराभर वेड्यावाकड्या

अक्षरात मी खरडीत जातो. नंतर सारे व्यवस्थित विचारपूर्वक लिहून काढतो. कित्येकदा ही खरडलेली वाक्ये विचारपूर्वक लिहिलेल्या वाक्यापेक्षा सरस उतरतात.

" ग्रंथ लिहिण्यापूर्वी त्यातील युक्तिवादाचा मी खूप विचार करतो. तो थोडक्यात, दोन तीन पानात लिहून काढतो. शीर्षक म्हणून एखादाच शब्द लिहून ठेवतो...एकाच वेळी निरनिराळ्या विषयावर लिहिणे चालूअसल्यामुळे माझ्या तीस चाळीस वह्या निरनिराळ्या खणात ठेवलेंल्या असतात, खणावर चिठ्या डकविलेल्या असतात.

" एका बाबतीत मात्र माझ्या मनात फार मोठा फरक घडून आला आहे. तिसाव्या वर्षापेक्षा मला काव्य आवडे. चित्रे व संगीत यांनी मला खूप आनंद होई. पण हल्ली मला कवितेची एकही ओळ वाचतव नाही. संगीताने आनंद होण्याऐवजी हाती घेतलेल्या कामांचीच आठवण होत राहते. उच्च अभिरुचि आता निर्जीव झाली आहे. माझे मन म्हणजे एक यंत्र झाले आहे. अवाढव्य पुरावा पिसून त्यातून ते नियम काढीत राहते....मला जर फिरून एकदा नव्याने जगता आले तर आठवड्यातून निदान एकदा तरी कविता वाचण्याचा किंवा संगीत ऐकण्याचा मी मी नियम करीन —

" माझी ग्रहणशक्ती सामान्य साहे. मी चांगला टीकाकार नाही पहिल्याच वाचनाच्या वेळी एखादे मस्तक मला एकदम आवडते. आणि मग विचार करताकरता त्यातील दोष दिसू लागतात. एकापाठोपाठ येणाऱ्या तात्विक विचारांकडे मी फार काळ लक्ष पुरवू शकत नाही. मात्र सामान्यतः लोकांच्या नजरेतून निसटणाऱ्या चुकाकडे माझे चटकन लक्ष जाते.

" तात्पुरती गृहीत धरलेली गोष्ट जरा विरोधी पुरावा पुढे आल्याबरोबरसोडून देण्याची माझी नेहमीच तयारी असते. तरीदेखील माझा स्वभाव संशयी नाही. शास्त्रज्ञ नेहमी चोखंदळ असावा तसा मी नाही.

" माझ्या वागण्यासवरण्यांत एक पद्धतशीरपणा आहे. उपजीविकेसाठी मला कधीच काम करावे लागले नाही. आजाराने माझा पुष्कळ वेळ वाया घालविला. यामुळे एक फायदाही झाला. मंडळींत बस-उठ, भेटीगाठी, करमणूक यांनी चित्त वाराचाटा धांवते तसे माझे झाले नाही.

" सरतेशेवटी, मला जे काय यश म्हणून मिळाले कशामुळे ? त्याला कारणे अनेक व विविध आहेत. मला शास्त्रीय ज्ञान संपादन करण्याची अमर्याद् आवड आहे. एखाद्या विपयाचे दीर्घकाल चिंतन करीत राहण्याची चिकाटी आहे. निरीक्षण करीत पुरावा गोळा करीत राहण्याचा मला कधी कंटाळा येत नाही. आणि सामान्यतः आढळते त्या प्रमाणांत संशोधनाची बुद्धि व व्यवहारज्ञानही माझ्यापाशी आहेत. हे गुण मोठ्या प्रमाणांत आहेत असे नव्हे; तरी देखील काही विशेष मुद्यांबाबत माझ्या लेखनाने शास्त्रज्ञांच्या मनावर इतका मोठा परिणाम करावा हे खरोखरीच आश्चर्य आहे."

' सुटी हा शब्द आपल्या भापेंतील नाही. मला त्याची ओळख नाही, ' डार्विननी एका पत्रांत लिहिले होते. त्यांचे सारे जीवन, अगदी अंतकाळापर्यंत उद्योगाने भरलेले होते. रिकामा क्षण त्यांना माहीत नव्हता. ' गांडुळांच्या कार्या ' पासून ' जीवजातींच्या उत्पत्ति ' पर्यंत सारेच त्यांच्या संशोधनाचे विपय !

उपजीविकेसाठी त्यांना कधीच काम करावे लागले नाही. त्यांच्या पत्नी एमा वेजवुड त्यांच्या बारीकसारीक शारीरिक स्वास्थ्याच्या गोष्टींपासून तो मानसिक स्वास्थ्याच्या गोष्टीपर्यंत सारी काळजी घेत. आजारांत शुश्रूषा करीत. कामांत असतांना मदत करीत. डार्विन यांची मुद्रिते तपासून देत. असे त्यांचे सारे आयुष्य गेले.

वयाच्या त्र्याहात्तराव्या वर्षी ते लंडनला गेले होते. आपल्या एका मित्राच्या घरी भेटीला जात असतांनाच त्यांना भोवळ येते आहे असे वाटले. मित्र घरांत नव्हता. त्यांच्या चर्येवरून ते फारच अशक्त दिसले.

नोकराने त्यांना आंत येण्याची विनंति केली. पण उगीच कशाला लोकांना त्रास, या भावनेने त्यांनी एक टॅक्सी बोलाविली. येथून ते जे निघाले ते त्यांच्या शेवटच्या प्रवासालाच.

या आजारांतून ते उठलेच नाहीत. त्यांची पत्नी त्यांच्या शेजारी होती; शेवटचे शब्द त्यांनी उच्चारले ते "संशोधनाचे कार्य चालू ठेवायला माझ्यापाशी आता शक्ति नाही."

जगांत प्रचंड बौद्धिक क्रांति त्यांनी घडवून आणली. निसर्ग व मांनव हे परस्परांचे भाग आहेत हा क्रांतिकारी विचार त्यांच्यामुळे ज्ञात झाला. डार्विननी घडवून आणलेली क्रांति म्हणजे मानवाने स्वतःसंबंधी व स्वतःच्या कर्तृत्वासंबंधी केलेल्या विचारांतील क्रांति होती.

संशोधकाच्या जीवनाचे हे महाकाव्य १८७२ मध्ये समाप्त झाले !



* १४ *

# डार्विन यांचे कार्य

डार्विननी केलेल्या संशोधनामुळे एका नवीन युगाची सुरुवात झाली. अंधश्रद्धा जाऊन तिची जागा शास्त्रीय सत्याने घेतली. मानवाची शास्त्रनिष्ठा वाढीस लागली. असे असले तरी डार्विन यांच्या उत्क्रांति-तत्त्वापासून काही लोक चुकीच्या निर्णयाप्रत येऊन पोचलें हेही मान्य करावयाला हवे.

सर्व काही सृष्टिनियमानुसार होणार, आपल्या हाती काय आहे? असा निराशावाद डोके वर काढू लागला. पूर्वी सारे काही ईश्वरावर सोपवून स्वस्थ बसणारे लोक आता उत्क्रांतिवादावर विसंबून राहू लागले. " नालायकांच्या कपाळी नाश " या सूत्राचा गैरवापर करून काहींनी युद्धखोरीला उत्तेजन द्यावयाला सुरूवात केली. ' जीवनार्थ कलह ' या तत्त्वाचा आधार घेऊन काहीनी जंगलच्या कायद्याला प्रतिष्ठा मिळवून देण्याची धडपड केली.

या साऱ्यांची एक मोठी चूक झाली. ती म्हणजे डार्विनवादाच्या मर्यादा न ओळखणे. डार्विन यांचे सारे संशोधन वनस्पति व प्राणी यांच्या जाती कशा निर्माण झाल्या या प्रश्नावर केंद्रित झालेले आहे. जीव व प्राणी यांच्या संबंधी काढलेला निष्कर्ष जशाचा तसा मानवाला लागू करू पाहणे मोठीच चूक आहे.

मानव हा प्राणी खरा; परंतु तो इतर प्राण्यासारखा केवळ प्राणी नाही. मानवेतर प्राणी सर्वस्वी परिस्थितीवर अवलंबून असतात. झाडाच्या रोपाला पाणी मिळाले नाही तर ते मिळविण्यासाठी धडपड करण्याचे

त्याचे सामर्थ्य मर्यादित आहे. वनस्पतीपेक्षा मानवेतर प्राणी जरा कमी परतंत्र आहेत, इतकेच! मानवाचे तसे नाही.

मानव प्राणी अशी साधने कृत्रिम रीत्या बनवू शकतो आणि त्यांचा उपयोग करून आपल्याला हव्या असलेल्या वस्तु निसर्गापासून मिळवू शकतो; आणि नव्या तयार करू शकतो. ह्या साधनांना उत्पादनसाधने असे म्हणतात.

उत्पादन साधने सतत बदलत असतात. लाकडी कुदळ जाऊ शेतीधंद्यामध्ये नांगर आला. आणि आता ट्रॅक्टर आला. या साधनां जोरावर मनुष्य निसर्गावर मात करू पहातो आणि निसर्गात बदल घडवून आणण्याच्या प्रयत्नात खुद्द त्याच्यातहि बदल घडत तो. मानवाचा विकास अर्थातच केवळ नैसर्गिक घडमोडींवर अवलं . आणि म्हणूनच मानवाच्या विकासाला बुद्धिहीन मानवेतर ा विकासाचे नियम लावून चालत नाही.

मानवाचे व्यक्तिजीवन व समाजजीवन यामधील विरोध नाहीसा करून ही दोन्ही जीवने परस्परपोषक होऊन समृद्ध कशी होतील याचा मार्ग मानवाने शोधून काढला आहे. सुखस्वास्थ्य लाभावे म्हणून मानव आज ईश्वराची प्रार्थना करीत नाही, आपल्या बुद्धीच्या बळावर तो निसर्गावर मात करू इच्छितो. निसर्गाला आपला सेवक बनविण्यात आजच त्याला मोठे यश प्राप्त झालेले आहे. राहिलेल्या यशाचे पुरेपूर माप तो आपल्या पदरात निश्चितपणे बांधून घेईल यात शंका नाही.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा
अनुक्रम ७८२६६ दि. ०१ · ९१
३५० नोंद दि. ०१.१.९१
IRBK-0111391

# डार्विन यांचा जीवनपट

**१८०९ : फेब्रुवारी १२ : जन्म ( श्रूज्बेरी, इंग्लंड )**

१८२५ : वैद्यकीय व्यवसायाच्या शिक्षणासाठीं
एडिन्बरो विश्वविद्यालयात दाखल

१८२८ : धर्मगुरु ( पाद्री )च्या व्यवसायाच्या शिक्षणासाठी
केंब्रिज विश्वविद्यालयात दाखल

**१८३१ डिसेंबर ते १८३६ ऑक्टोबर : 'बीगल'
जहाजावरून विश्व-पर्यटन**

१८३८–१८४१ : भूगर्भविज्ञानविषयक सोसायटीचे चिटणीस.

**१८३९ : विवाह**

'जर्नल ऑफ रिसर्चेस' ( संशोधन-पत्रिका )चे
प्रकाशन. 'निसर्गशास्त्रज्ञाचा जल-प्रवास' या
पुस्तकाचे प्रकाशन

१८४२ : 'प्रवाळांच्या बेटांची रचनात्मक विभागणी'
या पुस्तकाचे प्रकाशन

१८४४ : दक्षिण-पूर्वेकडील बेटांविषयींच्या पुस्तकाचे प्रकाशन

१८४६ : 'ज्वालाभूमिजन्य बेटांची भूस्तरविषयक निरीक्षणे'
या पुस्तकाचे प्रकाशन

१८५१–१८५४ : 'सीरीपिडस' ( एक सागरी प्राणी ) वरील
पुस्तिकेचे प्रकाशन

**१८५९ : 'जीवजातींची उत्पत्ति' या पुस्तकाचे प्रकाशन**

१८६२ : 'कीटकांमार्फत ऑर्किडसचे ( एक फूल झाड )
फलीभवन' या पुस्तकाचे प्रकाशन

१८६७ : ‘ वर चढणाऱ्या वेलींच्या हालचाली आणि त्यांच्या संवयी ’ या पुस्तकाचे प्रकाशन

१८६८ : ‘ प्राणी आणि वनस्पति : मानवाने घडवून आणलेले बदल ’ या पुस्तकाचे प्रकाशन

**१८७१ : ‘ डिसेंट ऑफ मॅन ’ ( मानवाचे अवतरण ) या पुस्तकाचे प्रकाशन**

१८७२ : ‘ मानव व जनावरांतील भावनांचा अविष्कार ’ या पुस्तकाचे प्रकाशन

१८७५ : ‘ कीटक-भक्षक वनस्पति ’ या पुस्तकाचे प्रकाशन

१८७७ : ‘ एकाच जीवजातीतील वनस्पतींवरील फुलांचे विविध प्रकार ’ या पुस्तकाचे प्रकाशन

१८८० : ‘ वनस्पतींतील चलन-शक्ति ’ या पुस्तकाचे प्रकाशन

**१८८२ : एप्रिल १९ : मृत्यु**

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
दा. क्र. ११३९१ नों. दि. ...........
वि. ८०-८१ क. ...............